नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

जा-फे-मा, ए-मे-जून-०८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुधीर श्रीकृष्ण मोदे

जन्म १९५२ साली. मुंबईच्या ख्यातनाम जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून जी. डी. आर्ट (ड्रॉईंग ॲन्ड पेन्टिंग). सध्या अमरावतीच्या चित्रकला महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून कार्यरत.

शासकीय आणि विद्यापीठीय स्तरावर अनेक सन्मान आणि नियोजनात सहभाग. कलेच्या पातळीवर सांगण्यासारखे पुरस्कार म्हणजे १९७५ मध्ये वार्षिक कलाप्रदर्शनात (नाशिक) प्रथम पुरस्कार, मुंबईतील १९७६ मधील म्हैसूर असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सवी कलाप्रदर्शनात प्रथम पारितोषिक. बॉम्बे आर्ट सोसायटी; जे. जे. मधील जी. डी. शिरगावकर ॲवॉर्ड, स्व. दीनानाथ दलाल स्मरणार्थ पारितोषिक...



नाशिक, मुंबई, औरंगाबाद येथील प्रमुख चित्रप्रदर्शनात नियमित सहभाग आणि स्वतंत्र चित्रप्रदर्शने. अनेक म्युरल्सनी अनेक वास्तूंचे सौंदर्य वाढविले.

जलतरंगातील पारदर्शक नजाकत ॲक्रिलिक माध्यमातूनही तेवढ्या हळुवारपणे मोदे चितारतात. विदर्भातील जुनी मंदिरे, जुने वाडे, कौलारू घरे, चौक, नदीचा प्रवाह, कोरीव कमानी, पडझडीतही समृद्धीची आठवण करून देणारी दगडमाती मोदेंच्या चित्रात दृश्यमानच नव्हे तर गतिमान होते. लाल, पिवळा, तपकिरी, पिकॉक ब्ल्यू, क्रिमझन रंगाचा उपयोग ही त्यांची विशेषता. तैलरंग, पेस्टल्स क्रेऑन्स, स्केचपेन्स या माध्यमांचाही त्यांनी समर्थपणे उपयोग केला आहे. अधिकाधिक शक्यता अजमावण्याची त्यांची आकांक्षा त्यांना कलाक्षेत्रात अपेक्षित उंचीवर घेऊन जाईल याची खात्री वाटते.



- संपादक

[प्रा. सुधीर मोदे, शिवार्पण कॉलनी, विदर्भ महाविद्यालय मार्ग,
अमरावती - ४४४६०४. मो. ९८८१५७२६०२]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

वर्ष ५८ वे अंक तिसरा

जानेवारी/फेब्रुवारी/मार्च २००८

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक नारायण कुळकर्णी कवठेकर

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

कै. भाऊजी दफ्तरी संदर्भ ग्रंथालय
३७३५८
दाखल नोंद क्रमांक
दिनांक ३.३.१४
४९
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

मुखपृष्ठ व आतील चित्रे
सुधीर मोदे

मुखपृष्ठ मांडणी
विवेक रानडे

अक्षरजुळणी व मुद्रण
नारायण ऑफसेट वर्क्स, धंतोली, नागपूर

मूल्य : चाळीस रुपये

वार्षिक वर्गणी : शंभर रुपये

प्रकाशक
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक,
नागपूर - ४४००१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९

संपादकीय पत्रव्यवहार
'किताव', राऊतवाडी, अकोला - ४४४५०५
दूरध्वनी : ०७२४-२४५०१८५
भ्रमणध्वनी : ९८५०७४२८८१
ई-मेल पत्ता : narayankulkarnik@gmail.com

या अंकात प्रसिद्ध झालेल्या
लेखनातील मतांशी
संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे
पदाधिकारी सहमत असतीलच
असे नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ संपादकीय ॥

कलावंताची जन्मशताब्दी

कलावंत एका कालखंडात जगतो. निर्मिती मागे ठेवून निघून जातो. पुढील काळात येणाऱ्या कलावंतांच्या, रसिकांच्या, अभ्यासकांच्या, विद्यार्थ्यांच्या पिढ्या त्याच्या निर्मितीवरती जगतात. हे जगणे आनंदपूर्णच असते असे नाही, कधी ते अस्वस्थता निर्माण करणारे, कधी नवी किंवा वेगळी दिशा सापडणारेही असते. आपले मन त्या कलावंताविषयीच्या कृतज्ञतेने भरून येते. हा कलावंत आणि त्याची कलाकृती सार्वकालिक आहे असे आपण म्हणतो. काळाला पुरून उरणे वा काळावर मात करणे असे शब्दप्रयोग तसे उथळ असतात. उगाच स्पर्धा वगैरेची सूचना करणारे खरे तर कलावंताच्याही नशिबी चढ-उतार येतात. पण उताराचीही दखल घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही. एरवीही मोठ्या कलावंताची दखल - त्याच्या व्यक्तित्व आणि कतृत्वाची - घेतली जातेच. जन्मशताब्दी हे एक ठळक निमित्त. ठळक यासाठी म्हणावयाचे की कलाकृतींनी कलावंताचा जन्म (पुन्हा एकदा) घेतलेला असतो. पण अधिकृत जन्मतारीख आपण विचारात घेतो. ते योग्यही आहे. एक शतक उलटल्यानंतरही तो कलावंत आपली सोबत करतो आहे. त्याच्या शब्दांचे बोट धरून आपण चालतो आहोत, पुलकित - अस्वस्थ - स्तब्ध होत आहोत ही जाणीवच थरारून टाकणारी असते. गंभीर अभ्यासक वेगवेगळ्या तऱ्हांनी त्या कलाकृतीकडे कसे पाहत असतात याचा एक दाखला सत्वशीला सामंत यांच्या बोरकरांसंबंधीच्या लेखाच्या रूपाने या अंकात पाहायला मिळेल. जाणकार, वाचक यांच्या प्रतिक्रिया अपेक्षित आहेत. (त्या लेखाचे शुद्धलेखन लेखिकेच्या आग्रहानुसार.)

नारायण कुळकर्णी कवठेकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अ। नु। क्र। म

लेख :

वोरकर-कवितेतील 'रमलखुणा' / सत्त्वशीला सामंत / ५
कुसुमाग्रजांची "लिलाव" एक चिंतन / डॉ. केशव फाले / ११
लोककथेचे स्वरूप / डॉ. प्रकाश मेदककर / १४
मराठी गझलेतील जननिष्ठा एक शोध / डॉ. अविनाश सांगोलेकर / २३

कविता :

पाच कविता / कैलास रा. दौंड / ३०
कसे सांगावे / नीळकंठ कदम / ३१

भवताल :

ययातीचे देहान्तर / परशुराम / मराठी अनुवाद प्र. ब. कुळकर्णी / ३२

वि. सा. संघाचे कार्यवृत्त / ३९

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

।। बोरकर-कवितेतील 'रमलखुणा' ।।

। सत्त्वशीला सामंत

२००३-०४ च्या सुमारास 'कवि बोरकर स्मृति समिति' तर्फे 'बोरकरांची समग्र कविता' हा प्रकल्प सिद्ध करण्याचा संकल्प सोडण्यात आला. 'देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. पुणे' यांनी त्याचे प्रकाशन करण्याचे कबूल केले. कविवर्य बोरकरांच्या कन्या, सौ. पद्मा वज्रम् व त्यांचे जामात श्री. आप्पासाहेब वज्रम् यांचा माझा परिचय होताच, शिवाय बोरकरांच्या कवितेविषयी मला ममत्वही होतं. निखळ बोरकर-प्रेमापोटी मी त्या संहितेच्या संपादनाची जबाबदारी स्वीकारली. जानेवारी २००५ मध्ये पहिला खंड व मार्च २००८ मध्ये दुसरा खंड प्रकाशित झाला.

बोरकरांच्या सर्व कविता-संग्रहातील एकूण एक कविता कालक्रमाने छापावयाच्या असल्याने, त्यांची निवड करण्याचा प्रश्नच नव्हता. पण मग संपादन म्हणजे नेमकं काय करणं अपेक्षित होतं ? त्या संदर्भात असा विचार केला की, आपण भावी पिढीच्या अभ्यासकांना व रसिकांना सुगम होईल अशा स्वरूपात ती संहिता सिद्ध करावयाची. बोरकरांच्या पिढीतील बहुतेक कवी आपल्या कवितेखाली स्थल-कालाचा निर्देश करीत असत. त्या आधारे सर्व कविता मुळात कोणकोणत्या संग्रहात छापल्या गेल्या होत्या त्यांचे निर्देश करण्यात आले. दुसऱ्या खंडाच्या अखेरीस, सर्व कवितांच्या शीर्षकांची व पहिल्या ओळींची - अशा दोन सूच्या (पृष्ठांकांसहित) जोडण्यात आल्या. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बोरकरांच्या कवितांतील सर्व अपरिचित-विशेषतः कोकणी शब्दांचे अर्थ हुडकून कवितांखालील तळटिपांमध्ये ते अर्थ दिले. हा सर्व प्रयास व प्रवास खरोखरी आनंददायी होता. कित्येकदा अनेक जुने शब्दकोश चाळूनही काही शब्द हुलकावणी देत असत. अनेक व्यक्तींशी सल्लामसलत करूनही कधी कधी हाती काही लागत नसे. बोरकरांच्या आवडत्या 'पारजा'प्रमाणे अर्थ हातून निसटून जात असे. आणि मग कधीकधी ध्यानीमनी नसताना, अचानक जवळपासच कोठेतरी तो अर्थ भेटत असे. अशा वेळी मला अवर्णनीय साक्षात्कार झाल्याचा भास होई आणि माझ्या आनंदाला पारावार राहत नसे. काही अर्थकोडी मात्र आजमितीस उलगडलेली नाहीत. त्यांच्या बाबतीत -

"त्रिखंड हिंडुनि धुंडितसें
परि न हरपलें तें गवसे ।।"

अशी अजूनही माझी अवस्था आहे.

त्यांच्यावर डिसेंबर १९७० मध्ये काढण्यात आलेला 'मांडवी'चा विशेषांक हाती आला. तो चाळत असता, बोरकरांच्याच एका लेखावर नजर पडली - 'कविता फुलते अशी -' त्या लेखात त्यांनी 'तेथे कर माझे जुळती' या कवितेची जन्मकथा दिली होती. (पृ. २१९) अधाशीपणाने मी तो लेख वाचू लागले. १९३३ सालातील एका सायंकाळी दिवसभराची कामे आटोपल्यावर, काळोख पडण्याच्या सुमारास बोरकर शिणवटा घालवण्यासाठी घराजवळच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महालक्ष्मीच्या मंदिरापाशी गेले. देवीच्या गर्भागारातील नंदादीपांच्या झळाळत्या मालांकडे त्यांची नजर गेली आणि मग सहज ती आकाशाकडे वळली. वर तुरळक नक्षत्रे चमकू लागली होती. त्या क्षणिक आकाशदर्शनाने कवि एकदम मोहरून उठले आणि त्यांच्या तोंडून तालासुरांवर ओळी बाहेर पडू लागल्या -

''तेथें कर माझे जुळती,
दिव्यत्वाची जेथ प्रतीति...''

नंतर महाद्वारातून ते हमरस्त्यावर फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले. हिंडत असताना, वाटेत त्यांना जी जी दृश्ये दिसली त्यांच्या अनुषंगाने त्यांना त्या कवितेचे पुढील चरण सुचत गेले. अखेरीस ते जेव्हा थांबले तेव्हा आपला फेरफटका ही आज दिव्यत्वाची परिव्रजा ठरली आहे असे त्यांना वाटले. ते म्हणतात - ''...रात्र बरीच झाली होती. आकाशाचा घुमट असलेले हे विश्व हेच एक महामंदिर आहे. त्याच्या गर्भागारात शांतीची देवता आसनस्थ आहे. काळोख तिच्या मस्तकावरून चवऱ्या ढाळीत आहे आणि अशा वेळी मी मात्र त्यक्त, बहिष्कृत आहे...'' हे वाचताक्षणी माझ्या डोळ्यांसमोर मात्र अंधारी आली. कारण मी लावलेला अर्थ चुकला होता व कवीला 'शांतिशिरी' (म्हणजे 'शांतिदेवतेच्या मस्तकावर तम चवऱ्या ढाळीत आहे') हेच अभिप्रेत होते हे मला कळून चुकले. पण बाण माझ्या हातून निसटला होता. कवितांचा खंड प्रकाशित झाला होता व आता मी त्यात बदल करू शकत नव्हते. (शेवटचा उपाय म्हणून आम्ही त्या छापील प्रतीत 'शांति शिरीं' हे शब्द हाताने जोडून घेण्याचे ठरवले.) हा लेख माझ्या वाचनात अगोदर आला असता तर माझ्या हातून अशी चूक घडली नसती अशा विचाराने आताशा मन खंतावतं आणि 'एकांतीं डोळे भरती' - अशी माझी स्थिति होते.

'जार-जारिणी' हे बोरकरांचे एक आवडते आध्यात्मिक रूपक आहे. लौकिक जगात वावरणाऱ्या व्यक्तीला जेव्हा पारलौकिकाची ओढ लागते तेव्हा ती लौकिक संसाराशी बेईमान होऊन त्याच्याशी प्रतारणा करते. राधा आणि मीरा ह्या तर सर्व संतकवींना आणि बोरकरांसारख्या आधुनिक कवींनाही मोहवणाऱ्या नायिका. 'ये पुढल्या दाराने' (खंड १ २११), 'आज तुझ्या घरि आल्ये' (खंड १ ३७१) आणि 'मज सजवि वाइये' (खंड २ १८५) अशा काही कवितांतून बोरकरांनी पारलौकिक परपुरुषाशी रत होणाऱ्या नायिकांचे रमणीय चित्रण केले आहे.

'हरिच्या स्मरभुवनी' (खंड १ २५१-२५२) ह्या कवितेतली नायिका तर लग्नघटिका जवळ आली असता, सखीचा हात धरून बोहल्यावरून पळून जाण्याच्या विचारात आहे. ती सखीला म्हणते -

वराया तनु येवो नवरा
- - - - - - -
येथले पाश अतां तुटले
देहसुखा जें भुललें जग, त्या मन माझें विटलें
भुले जो केवळ देहसुखा
स्पर्शे का तो शकेल उजळूं हृदयांतिल अलका ?
असा तुज काय रूचेल सखा ?
जीव हिरावुनि गेला त्याला म्हणशिल का परका?

याही कवितेत मला प्रथम 'अलका' हा शब्द अडला होता. परंतु मी माझ्या परीने त्याचा शोध घेऊन अर्थ लावला आणि तो अर्थ (परमेश्वराला) मी तळटीपेत दिला. मी दिलेल्या अर्थाबद्दल अन्य कोणताचा मतभेद होऊ शकेल अशी पुसटशी शंकाहि माझ्या मनात आली नाही. पण इतर काही शंकांचं निरसन करून घेण्यासाठी मी व वज्रम् पति-पत्नी एका चिकित्सक व जाणकार तज्ज्ञांकडे गेलो असताना, ती तळटीप त्यांच्या नजरेस पडली आणि ते एकदम उद्गारले - ''अहो, हा अर्थ चुकलाय् !'' मी तर भांबावूनच गेले. मग मी त्यांच्या मते बरोबर अर्थ काय असे त्यांना विचारलं. तेव्हा त्यांच्या मते 'अलका' म्हणजे 'अलकापुरी वा अलकानगरी' असा अर्थ आहे असं ते म्हणाले. मला तो अर्थ पटला नाही, म्हणून त्यांच्यावरोबर थोडा वाद घातला, पण अखेरीस त्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध व्यक्तींपुढे मला जरा नमतं घ्यावं लागलं. त्यानंतर मी आणखी दोन नामवंतांशी चर्चा केली, पण त्यांचंही मत तसंच पडलं आणि मी अल्पमतात गेले. तरीही माझं मन स्वस्थ नव्हतं. मी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लावलेलाच अर्थ बरोबर आहे असं माझं अंतर्मन सांगत होतं. सरतेशेवटी पुस्तकातील तळटीपेत मी मला पटलेला आणि इतरांनी लावलेला - असे दोन्ही अर्थ बरोबर आहेत असं माझं अंतर्मन सांगत होतं. सरतेशवेटी पुस्तकातील तळटीपेत मी मला पटलेला आणि इतरांनी लावलेला - असे दोन्ही अर्थ दिले.

कवितेतल्या संबंधित ओळी अशा -

भुले जो केवळ देहसुखा
स्पर्श का तो शकेल उजळूं हृदयांतिल अलका ?

ह्या ओळींचा संदर्भ पाहतां, प्रत्येकाच्या हृदयात असं 'काहीतरी' मूलतः असतंच, पण कांही कारणाने त्यावर काजळी धरते व ती दूर सारली की तें 'काहीतरी' उजळून निघतं असा स्पष्ट वाच्यार्थ दिसतो. मग हे 'कांहीतरी' म्हणजे काय ? त्या नामवंतांच्या म्हणण्यानुसार, ती 'अलकापुरी वा अलकानगरी' होय असं वादापुरतं मान्य केलं तरी, प्रत्येकाच्या हृदयात 'अलकानगरी' वसत असते आणि कधी कधी ती काळवंडते व मग तिला उजाळा द्यावा लागतो. उलट, कुबेराची अलकानगरी म्हणजे लौकिक ऐश्वर्याचं आणि देहसुखाचं आगार होय आणि बोरकरांच्या कवितेतली नायिका नेमकी त्याच बाह्यवैभवाला नकार देत आहे. 'देहसुखा जे भुलले जग, त्या मन माझे विटले' असं ती म्हणते. म्हणून मी 'अलकानगरी' हा अर्थ मनोमन नाकारला. मग माझ्या मते 'अलका' या शब्दाचा खरा आणि नेमका अर्थ काय होता ?

प्रत्येकाच्या अंतःकरणात परमेश्वर वसत असतो, अविद्या, माया, इ. भ्रमांमुळे तो परमेश्वर कित्येकदा मलिन होतो, काळवंडतो; मात्र साधुसंतांच्या संगाने ते मालिन्य दूर होते व तो परमेश्वर उजळून निघतो, त्या 'हृदयस्थ परमेश्वरा'ला जाग येते असा एक संकेत भारतीय तत्त्वज्ञानात रूढ आहे. बा. भ. बोरकर हे नाथपंथी संत सोहिरोबांचे भक्त होते. (त्यांनी एके काळी सोहिराबांचे चरित्रही लिहिले होते.) व नाथपंथात 'अलख निरंजन' (परमेश्वर) ही संकल्पना प्रचलित आहे. 'अलख' हा मूळ 'अलक्ष्य' शब्दाचा अपभ्रंश आहे. 'अलक्ष्य' वा 'अलख' याचा अर्थ 'परमेश्वर वा ब्रह्म' होय. पण मग बोरकरांनी 'अलका' असा शब्द कां वापरला असेल याचा मागोवा घेण्यासाठी मी 'महाराष्ट्र शब्दकोश' उघडला. तेथे मला 'अलख' शब्दापुढे 'अल्लक; ब्रह्म; त्यावरून ईश्वर' असे अर्थ सापडले. 'अल्लक' याचे द्वितीया विभक्तिरूप 'अलकाला' असे होणार. (कारण ज्या मूळ शब्दांत एखाद्या वर्णाचे द्वित्व असतें त्यांच्या विभक्तिरूपात ते निघून जाते, उदा. रक्कम - रकमेला, चप्पल - चपलेला, दुक्कल - दुकलीने, मुद्दल - मुदलात, इ.) तसेच जुन्या काव्यात द्वितीयेचा प्रत्यय लोप लावण्याची प्रवृत्ति दिसते. म्हणून 'अलकाला' (ईश्वराला) याचे 'अलका (ला)' असे संक्षिप्त रूप झाले. पण तरीही बहुशः 'अलख' हा शब्दप्रयोग रूढ असताना, बोरकरांनी क्वचित् वापरला जाणारा 'अलक' हा शब्द का योजला असावा ? त्याचं उत्तर मला पुढील चरणात मिळालं, तेथे 'परका' हा शब्द आला असून त्याच्याशी यमक साधण्याच्या उद्देशाने बोरकरांनी 'अलका (ला)' हा शब्द वापरलेला दिसतो.

त्याचबरोबर, मूळचा 'ख'कारी शब्द मराठीत 'क' कारी होण्याची प्रवृत्ति आहे काय याचाही मी शोध घेतला. तेव्हा मला पुढील शब्द सापडले. उदा.-

भक्ष्य (सं.) - भख - भक (ग्रामदेवता, इ. स दिलेले अन्न, भक्ष्य, बळि - महा. शब्दकोश - दाते)
साक्ष्य (सं.) - साक्ष - साख - साक (पुरावा, पत)
शिक्षा (सं.) - शिख - शिक/शीक (वण)
भिक्षा (सं.) - भीख (हिं.) - भीक
बुभुक्षा (सं.) - भूख (हि) - भूक
दोख (हिं.) - ढोक (पक्षी)
धोखा (हिं.) - धोका
झरोखा (हिं.) - झरोका
शुष्क (सं.) - सूखा (हिं.) - सुका
भाषा (सं.) - भाखा/भाख - भाक (वचन - आणभाक)

हा शोध चालू ३सताना, अकस्मात् मराठीचे निरुक्तकार व इतिहासाचार्य वि. का. राजवाडे माझ्या साह्याला धावून आले. 'साहित्य अकादमी' ने प्रकाशित केलेल्या 'राजवाडे लेखसंग्रहा'त 'प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास' असा त्यांचा एक लेख असून,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यात त्यांनी 'भीक' या शब्दाचा दुसरा चेहरा दाखवला आहे -

भीषा (सं.) (=भय) - भीख - भीक

(त्यावरूनच 'भिकूड - भेकड') अशी त्यांनी आणखी एक व्युत्पत्ती सांगितली आहे. 'मी धमक्यांना भीक घालीत नाही.' अशासारख्या वाक्यात 'मी धमक्यांना भीत नाही', असा भावार्थ आहे. सुप्रसिद्ध, लेखक प्रा. शंकर सखाराम ह्यांनी आपल्या 'बलुतेदार' या पुस्तकात आगरी, कातकरी, इ. बोलींची जी वैशिष्ट्ये नमूद केली आहेत. त्यामध्येही 'ख' चा 'क' होण्याकडे 'मी धमक्यांना भीत नाही', असा भावार्थ आहे. त्यामध्येही 'ख' चा 'क' होण्याकडे कल दिसतो. उदा. -

सुखी - सुकी (गणपती गजानना सुकी ठेव रे बाप्पा)

सखा - सका;

खटारा - कटारा; इ.

"या नियमानुसार आमच्या बोलीत 'अलख' चा 'अलक'च होणार" (असंहि ते) मला समक्ष भेटीत म्हणाले.

थोडक्यात, माझ्या मते 'अलका (ला)' म्हणजे 'परमेश्वराला' असा अर्थ संभवतो -

भुले जो केवळ देहसुखा
स्पर्श का तो शकेल उजळूं हृदयांतिल अलका ?

(जो निव्वळ देहसुखाला भुलतो तो अंतरंगातील वा हृदयातील सुप्त परमेश्वराला उजाळू शकेल का?) पण तरीही अजून माझं पुरतं समाधान झालेलं नाही. कारण 'अलक' हा शब्दप्रयोग मराठी वाङ्मयात कुठे आला आहे याचा उल्लेख (महा. शब्दकोशा'त) नाही. माझा तर्क असा की, संत सोहिरोबांच्या वाङ्मयात कुठेतरी हा शब्द वापरला गेला असावा. त्याचाही शोध घेण्याचा मी जंगजंग प्रयत्न केला. पण अजून यश आलं नाही. माझ्या मताच्या पुष्ट्यर्थ मला कुठे असा उल्लेख सापडला तर, माझ्या मताला अधिकच बळकटी येईल. मी अजूनही पोषक पुराव्याच्या शोधात आहे.

बोरकरांच्या 'बारा मास एका क्षणी' (खंड १ ३८२) या कवितेने असेच मला गुंगविले. प्रेयसीच्या रूपाच्या विविध मनोहारी आविष्कारातून कवीला बाराही मासांच्या सौंदर्याचा साक्षात्कार होतो अशी त्यातील मध्यवर्ती कल्पना असून, प्रत्येक कडव्यात त्याने एकेका महिन्याचे वर्णन केले आहे. चौथ्या कडव्यात कवि म्हणतो -

तुझ्या शब्दीं आश्विनाच्या आकाशाचे चमत्कार
हावभाव लकारांत करी कार्तिक शृंगार ।

या ठिकाणी 'लकार' म्हणजे नेमका अर्थ काय असा प्रश्न उपस्थित झाला. 'लकार' याचा कोशगत अर्थ 'लबाड, लुच्चा, लफंगा, इ.' असा असून तो अर्थ इथे अप्रस्तुत आहे. 'लावण्य, ललाम (शोभा), लालित्य, लवलव' इ. सौंदर्यगुण तर नव्हेत ना अशी शंका मनाला चाटून गेली. पण तसं ठासून सांगण्याइतपत आधार मिळाला नाही. म्हणून अखेरीस तो मुद्रणदोष असून तेथे 'लकेर' असा शब्द असावा असे मानून अर्थ दिला. 'लकेर' म्हणजे 'गाण्याची लकेर' या सुप्रसिद्ध अर्थाव्यतिरिक्त त्याला 'तेज, चकाकी, माधुर्य, मोहकता, मनोरम सौंदर्य' असेही अर्थ असल्याचे आढळले. अचानक मला दुर्गाबाई भागवतांच्या 'ऋतुचक्र'मधील 'संध्यारंजित कार्तिक' आठवला -

"...संध्याकाळी...सूर्य बुडू लागला की ही अभ्रखंडे एकदम सोनेरी होतात. किती सोनेरी आणि तेजस्वी म्हणून सांगू ! मावळत्या सूर्याचा लाल गोळा झगमगीत सोन्याच्या ढिगात ठेवल्यासारखे वाटते..."

इथे मला कार्तिकमास आणि सोनेरी चकाकी या दोहोंमधील 'तेजस्वी' दुवा सापडला. कवि हयात नसल्याने 'स्थितस्थ गतिश्चिन्तनीया' या न्यायाने कशीबशी अर्थनिष्पत्ती केली. मनाचं पुरतं समाधान मात्र झालं नाही.

जुलै १९८४ मध्ये कविवर्य बोरकर निधन पावले. तत्पूर्वी एप्रिल महिन्यात त्यांच्या डोळ्यांना मोतीबिंदूची व्याधी झाल्याने त्यांना रुग्णालयात भरती केले होते. मधुमेहाचा आजार असल्याने डोळ्यांवरील शस्त्रक्रिया अवघड होती, शिवाय शस्त्रक्रिया झाली तरी ती यशस्वी होईलच याची खात्री नव्हती. त्यामुळे दृष्टी परत आली नाही तर, आपलं भवितव्य अंधकारमय राहणार या चिंतेने त्यांना घेरलं होतं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि त्यांचं मन निराशेने ग्रासलं होतं. अशा अवस्थेत त्यांच्या तत्त्वचिंतक मनाने या 'तमा'शीच जवळीक करण्याचं ठरवलं आणि रुग्णशय्येवर असतानाच त्यांना 'तमःस्तोत्र' स्फुरलं. (खंड १:४८१) 'रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल' असं कुसुमाग्रज म्हणतात त्याप्रमाणे बोरकर भगवान् तमाला उद्देशून 'प्रकाशजनका पुरुषोत्तमा' असं संबोधतात. संपूर्ण कवितेवर उपनिषदांच्या तत्त्वज्ञानाची छाप आहे. याच कवितेतील एक चरण असा -

ऐसा तू गा दातारू
निजानंदाचें आवारूं
मृत्यु होऊनि माझा भारू
सारोद्धारू वाहिलासी -

'सारोद्धारू' या शब्दाने मला छळ छळ छळलं. अनेक संस्कृत, मराठी शब्दकोशांतून धांडोळा घेतला. कविवर्य पाडगांवकरांपासून अनेकांशी चर्चा केली, पण हाती काही गवसलं नाही. 'महाराष्ट्र शब्दकोश' पाहताना मी 'सार' या शब्दाखालच्या नोंदी तपासल्या. पण व्यर्थ ! हताश अवस्थेत असताना एक दिवस अचानक पुन्हा 'महाराष्ट्र शब्दकोश' उघडला आणि 'सारोद्धारू' असा अखंड शब्द मिळतो का पाहू लागले, आणि काय आश्चर्य ! तिथे 'सारोदार, सारोद्धार' असे जोडशब्द दिसले. त्यापुढे "(कु. गो.) सदासर्वदा, सतत" असे अर्थ सापडले. ('यूरेका, यूरेका' म्हणून नाचायचंच तेवढं बाकी होतं.) म्हणजे कुडाळी व गोमंतकी बोलीतला हा साधासुधा शब्द होता. पण कविता गंभीर स्वरूपाची असल्याने 'सारोद्धार' हा एखादा भारदस्त संस्कृत शब्द असावा असा माझा ग्रह झाला. त्यामुळे शोधाची दिशा चुकली आणि 'काखेला कळसा नि गांवाला वळसा' अशी गत झाली. 'सारोद्धारू'ने मला असा चकवा दिला.

'जपानी रमलाची रात्र' (खंड १ : पृ. २२१) ही बोरकरांची अशी एक मायावी कविता आहे कीं, तिने अगणित रसिकांना भारून तर टाकलंच, पण कित्येक समीक्षकांपुढें आव्हानहि उभं केलं. कित्येकांना ही 'रमला' कोण असा प्रश्न पडला होता म्हणे ! (बहुतेकांना ही 'रमला' म्हणजे त्या कवितेतील जपानी रमणीच होय असं वाटलं होतं.) शब्दार्थ देताना मलाहि तसाच प्रश्न पडला होता. म्हणून मी 'रमला' या शब्दाला संस्कृतमध्यें 'रमणी' वजा कांही अर्थ आहे काय याचा शोध घेतला, पण कांही बोध झाला नाही. अकस्मात् माझ्या मनाला एक शंका चाटून गेली. 'रमला' हा स्त्रीलिंगी शब्द इथें अभिप्रेत असेल तर, मग कवीने त्या शब्दाचं 'रमलेची' असं सामान्यरूप कां केलं नाही ? त्याने असं केलं नाही त्याअर्थी मूळ शब्द 'रमल' असा अकारान्त तर नसेल ना ? मग या दिशेने माझी विचारशृंखला आणि शोधयात्रा चालू झाली. कै. य. रा. दाते यांचा 'महाराष्ट्र शब्दकोश' आणि मोल्सवर्थचा शब्दकोश धुंडाळला. 'रमल' हा मूळचा अरबी शब्द असून ती एक गूढ विद्या आहे. 'रम्ल' म्हणजे रेती किंवा वाळू. रेतीवर किंवा कागदावर काढलेल्या रेघांवरून अथवा फांश्यांवरून शकुन पाहण्याची विद्या म्हणजे रमलविद्या (geomancy). हिब्रू परंपरेतील ग्रॅबीअल् या देवदूताने डॅनियल् या प्रेषिताला ही विद्या शिकवली. यावरून 'रमल' याला हळूहळू 'गूढ' असा लाक्षणिक अर्थ प्राप्त झाला. या चक्रावून टाकणाऱ्या गूढतेमुळे मनावर एक प्रकारचं गारुड होतं. बोरकरांच्या कवितेतल्या जपानी गैशेने-रमणीने-कवीच्या मनावर असंच गारुड केलेलं दिसतं. म्हणून ही 'रमलाची रात्र'. योगायोगाने 'रमल' या शब्दाचं संस्कृत 'रमण' या शब्दाचीही सादृश्य आहेच आणि 'रमण' याला 'मोहक, मदन, विषयविलास, कामक्रीडा, मैथुन, आनंद' अशा अनेक अर्थांचे पैलू आहेत. म्हणून 'रमल' म्हणजे गूढरम्य सौंदर्य असा मी अन्वयार्थ लावला.

बोरकरांना ही कविता कशी सुचली, प्रत्यक्षात त्यांना अशी सुंदरी भेटली होती का आणि ती जपानीच होती का याबद्दलही अनेकांना गूढ वाटत होतं. "अशी रात्र तुम्ही खरोखरच जगलां होतां काय ?" असं एकदा एका रसिक विदुषीने त्यांना विचारलं. कवीने मोघम स्मित करून तिच्या प्रश्नाची बोळवण केली. अनुभव प्रतिभेतला असो किंवा प्रत्यक्षातला असो - रसिकाकडून अशी पावती मिळणे हीच कलेची सार्थकता अशी कवीची भावना होती. 'मांडवी'तील त्याच लेखात बोरकरांनी या कवितेची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कूळकथा निवेदन केली आहे.

१९४३ सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या २७ तारखेला मुरगांव बंदरात अमेरिकन आणि जपानी युद्धकैद्यांची अदलाबदल होणार होती. ती पाहायला बोरकरांचे दोन मित्र जाणार होते. ते बोरकरांकडे येऊन त्यांना आपल्याबरोबर येण्याचा आग्रह करू लागले. त्या सर्वांना बोटीवरील जपानी गैशा युवतींना पाहण्याचे औत्सुक्य होते. परंतु काही अडचणींमुळे बोरकरांना तेथे जाता आले नाही. तथापि, त्या काळात जपानी युवतींची चित्रे असलेल्या कॅलेंडरांची गोव्यात एक लाटच आली होती. त्या कॅलेंडरांवरील जपानी रूपयौवनांची सुकुमारता व उत्तेजकता यांची खुद्द बोरकरांवरही एक प्रकारची मोहिनी पडलेली होती. त्यामुळे यावेळी अश्या युवतींना प्रत्यक्षात पाहण्याची संधी हुकली म्हणून बोरकरांना हुरहूर लागून राहिली. त्या हुरहुरीतूनच 'जपानी रमलाची रात्र' ही कविता जन्माला आली. ती कविता आकाराला येत असताना कवीच्या सर्व ऐंद्रिय संवदेना इतक्या तीव्र झाल्या की, 'प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट' अशी त्यांना प्रतीति आली आणि रसिकांच्या मनांतही ती प्रतिबिंबित झाली.

पुढे अनेक वर्षांनी १९७० सालच्या सुमारास कविवर्यांच्या चिरंजीवांनी त्यांना एक जपानी बाहुली भेट म्हणून पाठविली. ती त्यांनी आपल्या मेजावर ठेवली होती. बोरकर लिखाण करून शिणले आणि खुर्चीत विसावले की त्यांना ती नजरेसमोर दिसे. मग तिच्याशी त्यांचा संवाद सुरू होई. त्यानंतर पुन्हा त्यांचा जीव ताजातवाना होऊन ते कामाला लागत. 'जपानी पोरगी' (खंड २ १९९-२००) या कवितेत बोरकर म्हणतात -

"मनांत येते :
आपला पुढचा जन्म
जपानमध्ये तर नसेल ?"

बोरकरांचं आणि जपानी सुंदरींचं असं काय जन्मांतरीचं नातं होतं हे वाचकाला न उकलणारं एक कोडंच आहे !

'बोरकरांची समग्र कविता' (खंड १ व २) याचं संहिता-संपादन करीत असताना, अश्या अनेक 'रमलखुणा' मला भेटल्या. त्या त्या वेळी मी वाच्यार्थ निश्चित करण्यापुरताच त्यांचा मागोवा घेतला आणि त्यातील कूटसौंदर्य अनुभवलं. अजूनही अश्या कित्येक 'खुणा' मला खुणावताहेत की ज्यांचे वाच्यार्थापलिकडील गूढार्थ देखील मला मोहवत आहेत. बोरकर-कवितेतील त्या गूढार्थांचाही कधीतरी मला वेध घ्यायचा आहे. ती मात्र खऱ्या अर्थाने माझी 'आनंदयात्रा' ठरेल !

■■■

साभार पोच

- युद्ध सुरू आहे (काव्य) : शशिकांत हिंगोणेकर, अस्मिता प्रकाशन, एन्-४ एफ -१/२१, सिडको, औरंगाबाद. एप्रिल २००९. मूल्य - १०० रु.
- गांधी-आंबेडकर अस्पृश्य मुक्ती संघर्ष : श्रीराम निकम, लोकवाङ्मय गृह, भूपेश गुप्ता भवन, ८५ सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५. नोव्हेंबर २००८. किं. २२५ रु.
- पंतप्रधानांना पत्र (काव्य) : अरूण शेवते, ग्रंथाली प्रकाशन, इं. ए. सोसायटीची शाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई - २८. ऑक्टोवर २००८. मूल्य ८० रु.
- ज्याचा त्याचा विठोबा.... (दोन नाट्यरूपके) आनंद विनायक जातेगावकर, लोकवाङ्मयगृह, भूपेश गुप्ता भवन, ८५ सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५. एप्रिल २००७. किं. १५० रु.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

।। कुसुमाग्रजांची "लिलाव" एक चिंतन ।।

। डॉ. केशव फाले

भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे शेतकरी हा या देशातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. उन, वारा, पाऊस झेलत शेतात राबणारा शेतकरी म्हणजे एका अर्थाने योद्धाच आहे. सैनिक रात्रंदिवस सीमेवर राहून आपले रक्षण करतात तर बळीराजा रात्रंदिवस काबाडकष्ट करून सर्वांच्या उदरभरणाची व्यवस्था करतो. परंतु साऱ्या जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा मात्र आज मरणाला जवळ करीत आहे.

शेकडो वर्षांपासून परिस्थितीशी दोन हात करीत हिंमतीने जगणारा शेतकरी आजच्या काळात आत्महत्या करतो आहे. शेतकरी-आत्महत्यांच्या आकडेवारीत विदर्भ आघाडीवर आहे. विदर्भात घडलेल्या व घडत असलेल्या आत्महत्यांच्या मागे **'कर्जबाजारीपणा'** हे सार्वत्रिक कारण असल्याचे सत्य समोर आले आहे. आजवर भारतीय शेतकरी कर्जबाजारी नव्हता असे नाही. तो कर्ज घेत होता. फेडत होता. व्याजही भरत होता. परंतु अलीकडच्या काळात एकीकडे त्याची कर्ज फेडण्याची क्षमता नष्ट होत आहे, तर दुसरीकडे सावकारी पाश पूर्वीपेक्षा जास्त आवळले जात आहेत. खासगी सावकार व सहकारी बँका बळीराजाची इज्जत वेशीला टांगून त्याला क्षणोक्षणी अपमानीत करीत आहेत. बळीराजा आपल्या इभ्रतीला तळहातावरील फोडाप्रमाणे जपतो. जेव्हा त्याच्या इज्जतीचे धिंडवडे काढले जातात, तेव्हा हा मानसिक आघात तो नसेल सहन करू शकत ! हे अपमानीत जीणे व आत्मसन्मानाचा भंग त्याला आत्महत्येच्या मार्गावर घेवून जात असावे.

भारतात लोकशाही आली. तिला सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करता आली नाही. या विषमतेचे सामाजिक परिणाम किती भयंकर होऊ शकतात याचा प्रत्यय वारंवार येत असतो. अपमानीत झालेल्या व्यक्तीच्या मानसिकतेचा विचार करता त्याची प्रतिक्रिया काय असेल ? अपमानीत झालेला माणूस एकतर सूड उगवेल किंवा स्वतःचे जीवन संपवेल. डॉ. रू. पां. पाजणकर यांच्या मते, **"अपमान, अपेक्षाभंग आणि आत्मप्रतिष्ठाभंग या तिन्ही व्यथांची, वेदनांची संकलित प्रतिक्रिया म्हणजे सूडभावना"**[१] विदर्भातील शेतकरी-आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर वरील विधानाचा विचार करता, मानहानीमुळे शेतकरी सूड उगवताना आढळत नाही. याचा अर्थ तो संवेदनाहीन किंवा स्वाभिमानशून्य आहे असा नाही. शेतकरी हा दाता आहे. 'देणे' हा त्याचा धर्म आहे. त्यामुळे सूड उगवणे त्याला माहीत नसावे. परंतु मानहानी झाल्याने कुठलीतरी प्रतिक्रिया घडणे स्वाभावीक आहे. येथेही ती घडते. या आंतरिक दुःखाचे पर्यवसान सूडाऐवजी आत्महत्येत होते. यासंदर्भात प्रा. सदानंद देशमुख यांनी आपल्या 'बारोमास' या कादंबरीच्या निमित्ताने मनोगतातून मांडलेले 'कटूसत्य' लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, **"... आत्मगौरव गमावलेला भूमीपुत्र काही अचानक आत्महत्या करीत नसतो... कर्जाच्या**

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ओझ्याखाली चिंताग्रस्त होऊन दडपून चालताना आधी त्याच्या आत्म्याची हत्या केली जाते आणि सगळाच भोगवटा असह्य झाल्यावर दृश्य स्वरूपात तो देहहत्या करीत असतो.''[२] प्रा. देशमुखांचे चिंतन वस्तुस्थितीला धरून आहे, असे म्हणता येईल. कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या होणे ही बाब निश्चितच शरमेची आहे.

विदर्भातील शेतकरी-आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर कुसुमाग्रजांच्या **''लिलाव''** या कवितेने मला चिंतन करण्यास भाग पाडले. प्रस्तुत कविता स्वातंत्र्यपूर्व काळात लिहिली असली तरी तिचे सामाजिक मूल्य आजच्या काळातही प्रेरणादायी ठरावे. ६०-७० वर्षांपूर्वीच्या कवितेत आजच्या शेतकऱ्यांच्या दूरवस्थेचे प्रतिबिंब तंतोतंत दिसावे ही कवीच्या प्रतिभेची किमया व त्यांच्या दूरदृष्टीचा परिणाम आहे.

सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडू न शकल्याने शेतकऱ्याचे सर्वस्वच कसे लिलावात काढले जाते याचे हृदयस्पर्शी चित्र कुसुमाग्रजांनी प्रस्तुत कवितेतून रेखाटले आहे.

''उभा दारी कर लावुनी कपाळा
दीन शेतकरी दावुनी उमाळा''

गरीब शेतकरी आपल्या घरासमोर हात लावून उभा आहे. सावकाराचा दूत लिलाव पुकारतो आहे. आपल्या घराचा लिलाव होतो आहे, या कल्पनेने त्याला उमाळा दाटून आला आहे.

''दूत दाराशी पुकारी लिलाव
शब्द कसले ते - घणाचेच घाव !''

लिलाव पुकारताना दूताच्या मुखातून निघत असलेले शब्द हे शब्द न वाटता आपल्या अंतःकरणावर कुणीतरी उद्दामपणे घाव घालीत असल्यासारखे त्याला वाटते. लिलावातील शब्द त्याच्या जिव्हारी लागतात. रक्ताचे पाणी करून मिळविलेले धान्यरूपी मोती क्षणार्धात लिलावात निघतात. घरातील बाजले, थाळी, गाडगी-मडकी इत्यादी वस्तूंवर झडप घालून त्या घराच्या बाहेर काढल्या जातात. या वस्तूंचे बाजारू मूल्य अत्यंत कमी असले तरी गरिबाचा संसार चालविण्यासाठी त्या मौल्यवान असतात. गरीब कुटुंबाची ती लाखमोलाची दौलतच असते. यावेळी शेतकऱ्याच्या पत्नीची अवस्थाही अत्यंत अत्यंत दयनीय आहे.

''स्तब्ध बाजूला बसे घरधनीण
लाल डोळ्यांतिल आटले उधाण''

मीठ-मिरचीपासून तर गाडग्या-मडक्यांपर्यंत संसारासाठी संचय केलेल्या वस्तू क्षणातच लिलावात निघाल्याने रडून-रडून शेतकऱ्याच्या पत्नीचे डोळे लालबुंद झाले आहेत. बराच वेळ रडल्यानंतर... प्रचंड दुःखावेगानंतर मानवी मनाची जी स्थिती होते, ती अवस्था कुसुमाग्रज 'लाल डोळ्यांतील आटले उधाण' या ओळीतून व्यक्त करतात. कर्जदार शेतकऱ्याची बायको तिच्या भूकेल्या लहान मुलाला पदर टाकून दूध पाजत असते. त्यावेळी माणुसकी व नैतिकता हरविलेला सावकार तिला न्याहाळत असतो.

''ऊर उघडे ते तिचे न्याहळोनी
थोर थैलितिल वाजवीत नाणी''

सावकाराला पैशाची गुर्मी चढलेली आहे. शेतकऱ्याच्या बायकोकडे पाहत त्याच्या जवळ असलेल्या थैलीतील पैशांचा तो खळखळाट करतो आहे. आणि त्या गुर्मीतच तो हीनपणाचे वर्तन करतो.

''आणि ही रे !'' पुसतसे सावकार,
उडे हास्याचा चहुकडे विखार !''

घरातील सर्व वस्तूंचा लिलाव करून झाल्याची खात्री केल्यावर ''आणि ही रे !'' असे उद्गार काढून सावकार आपल्या नीचपणाचे प्रदर्शन घडवितो. पैशाची गुर्मी चढलेल्या व माणुसकी हरविलेल्या सावकाराला घरातील वस्तूंसारखीच कर्जदाराची पत्नी ही सुद्धा एक वस्तूच वाटत असल्याने तो तिलाही लिलावात काढण्याची भाषा बोलून हास्याचा विषय बनवितो. त्याचे साथीदार त्याच्या नीचपणाला साथ देतात. अशा प्रसंगांना सामोरे जाताना कुठल्या माणसाचे काळीज घायाळ होणार नाही ? ही त्याच्या आत्मसन्मानाची, आत्मगौरवाचीच हत्या नाही काय ? असे प्रश्न मनात निर्माण करून कुसुमाग्रजांचे शब्द वाचकाचे अंतःकरण भेदून जातात.

भारतीय शेतकऱ्याच्या दूरवस्थेचे विदारक चित्र कुसुमाग्रजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात रेखाटले होते. बळीराजाच्या सर्वस्वाचा 'लिलाव' थांबला पाहिजे ही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांची अपेक्षा होती. त्यांच्या चिंतनातून द्रष्टेपणाचा प्रत्यय येतो. कारण काळ बदलला पण शोषितांचे लाचार जीणे व शोषकांची मानसिकता यात आजही काही बदल झोलला आढळत नाही. **''सामाजिकतेचं भान आणि तात्कालीकाच्या चिंतनाचा वेध घेण्याचं सामर्थ्य हे कवी कुसुमाग्रजाचे खास विशेष.''**[३] त्यांचा 'लिलाव' या कवितेतूनही प्रत्ययास येतात.

कुसुमाग्रजांनी उपेक्षित व शोषित वर्गाविषयी अपार सहानुभूतीने लेखन केले आहे. या वर्गाच्या दुःखाचे मूळ आपल्या सामाजिक विषमतेत आहे याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे विषमता नष्ट व्हावी असे त्यांना मनापासून वाटत असावे. कारण त्यांच्या शब्दांना मानवतेचा गंध व करूणेचा ओलावा होता. आज अपमानीत झालेला शेतकरी अपमानाचा घोट गिळत आहे. परंतु भविष्यात याचे पडसाद उमटल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा तर कुसुमाग्रजांना द्यावयाचा नसेल ? त्यावेळी कुसुमाग्रजांचा हेतू काहीही असो, परंतु त्यांच्या इशाऱ्याला आजच्या काळात मोठा अर्थ प्राप्त झाला आहे एवढे मात्र खरे !

असंख्य शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या रूपाने आज उमटत असलेल्या तीव्र पडसादाची पाळेमुळे, वर्षानुवर्षापासूनचा कर्जबाजारीपणा व बोचरा सावकारी पाश यात दडलेली आहेत असे म्हणता येईल.

सावकाराने मांडलेला लिलाव हा केवळ भौतिक वस्तूंचा लिलाव नसतो, तर शेतकऱ्याच्या मूलभूत हक्काचा व त्याच्या चारित्र्याचा 'लिलाव' मांडला जात असतो, ही बाब कुसुमाग्रजांना अधोरेखीत करायची होती. वाचकाचे लक्ष वेधून त्याआधारे त्याला अंतर्मूख करायचे होते. आणि त्यात ते यशस्वी झाले आहेत. यासंदर्भात वि. स. खांडेकरांचा अभिप्राय उल्लेखनीय वाटतो. ते म्हणतात, **''ज्या समाजरचनेत गरिबाच्या जगण्याच्या हक्काचा आणि स्त्रीच्या शीलाचा लिलाव मांडला जातो, ती समाजरचना शक्य तितक्या लवकर नष्ट झाली पाहिजे. असा त्वेष वाचणाऱ्याच्या मनात उत्पन्न करण्याची शक्ती या कवितेत निःसंशय आहे.''**[४] कुसुमाग्रजांच्या शब्दांतून व्यक्त होणारी पीडितांविषयीची कणव ही त्यांच्या तीव्र सामाजिक जाणीवेतून व मानवतावादी विचारसरणीतून अवतरली आहे.

प्रस्तुत कवितेच्या रूपाने कुसुमाग्रजांनी आपले चिंतन मांडले. त्यातून मोठी शिकवण व गर्भीत इशारा दिला. असाच इशारा अलीकडच्या काळात शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनांना शब्दरूप देणारे वऱ्हाडी कवी विठ्ठल वाघ यांनी आपल्या 'खापराचे दिवे' या कवितेतून दिला आहे.

''मंग सोंगेल फनाची अनी होते धारदार
कोनं सांगाव रगत तिले लागनार किती ?''[५]

त्यांच्या मते, पोटातली आग कधीतरी पेट घेणार आहे. क्रांतीच्या वणव्यात विषम व्यवस्था भस्म झाल्यावरच खापराच्या दिव्यातून वाती पेटतील.

शेतकऱ्यांना दुःखाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी सर्वकष प्रयत्नांची गरज आहे. या व्याधीवर तात्पुरती मलमपट्टी करून चालणार नाही. त्यावर शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नाही.

प्रस्तुत चिंतनाचे निमित्ताने आवर्जून सांगावेसे वाटते की, शेतकऱ्यांची दैन्यावस्था संपवण्यासाठी वेगाने पाऊले उचलली गेली नाहीत तर आज आत्महत्या करणारा उद्या 'हत्या' करण्यास मागेपुढे पाहणार नाही. म्हणूनच 'बळीचे राज्य' येणे ही पुढची मोठी क्रांती रोखण्याचा उत्तम मार्ग होय. कृषीप्रधान भारत देशात 'शेतकरी सुखी तर देश सुखी' ही संकल्पना रूजून शेतकऱ्याला सन्मानाची व प्रतिष्ठेची वागणूक मिळेल तो भारतीय समाजव्यवस्थेसाठी 'सोनियाचा दिनू' ठरेल.

संदर्भ :

१. पाजणकर रू. पा., 'गडकऱ्यांची नाटके : चिंतन आणि आकलन', म. रा. साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८, पृ. ११७
२. देशमुख सदानंद, 'बारोमास', (लेखकाचे मनोगत), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. द्वि. आ. २००५
३. घवी रवींद्र, 'प्रदक्षिणा', खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९१ पृ. १२
४. खांडेकर वि. स., प्रस्तावना, 'विशाखा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पुनर्मुद्रण २००१, पृ. ६१
५. वाघ विठ्ठल, 'काया मातीत मातीत' पूर्णा प्रकाशन, अकोला, १९८५, पृ. २४

■ ■ ■

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

।। लोककथेचे स्वरूप ।।

। डॉ. प्रकाश मेदककर

लोकसाहित्याच्या अभ्यासकांमध्ये 'लोककथा' हा साहित्यप्रकार प्राचीन काळापासून विशेष लोकप्रिय असलेला दिसून येतो. त्यामुळे प्राचीन काळापासूनच लोककथेच्या संकलनाचे, संग्रहीकरणाचे मोठ्या प्रमाणात प्रयत्न झालेले दिसून येतात.

पारंपरिक कथांचा संग्रह करण्याचा पहिला प्रयत्न गुणाढ्याने केला. त्याने पैशाची भाषेत 'बृहत्कथा' हा संग्रह सिद्ध केला. कथेचे लौकिक स्वरूप कायम ठेवणे हा बृहत्कथेचा मोठा विशेष म्हणावा लागेल. कथेकडे केवळ कथा म्हणून पाहणे हेच बृहत्कथेचे वैशिष्ट्य होते. खरे तर त्यापूर्वी बौद्धांनी, जैनांनी आपल्या कथा सर्व संप्रदायातून याज्ञिक विशेष वगळून संप्रदायनिर्विशेष स्थितीत उचलल्या होत्या. तरी हे दोन्ही पक्ष स्वतः सांप्रदायिक असल्यामुळे त्यांना या ना त्या रुपाने आपल्या संप्रदायाची तांत्रिक चौकट कथांना घालावी लागली. 'बृहत्कथे'ने त्यांच्यापुढे पाऊल टाकून गुणाढ्याच्या काळापर्यंतच्या धार्मिक पार्श्वभूमीचे उच्चाटन केले.[1] नंतरचा प्रयत्न वररुचीचा दिसून येतो. गुणाढ्य, वररुची या वैय्याकरणांचे प्रयत्न भारतीय कथासंग्रहाच्या परंपरेत महत्त्वपूर्ण आहेत. विष्णुशर्मा यांचे 'पंचतंत्र' शिवाय अन्य कथांचे संग्रह उदाहरणार्थ, हितोपदेश, वेताळपंचविशी, शुकसप्तशती हे ग्रंथही भारतात संपन्न परंपरेचा पुरावा देतात. बौद्ध जातके आणि जैनचूर्णी हे लोककथांच्या नीतिकथाप्रकारांचेच संग्रह आहेत.

इ.स. १० व्या शतकाच्या अखेरीपासून तो १२ व्या शतकाच्या अखेरीपर्यंतचा २०० वर्षांचा कालखंड जागतिक लोकसाहित्याच्या इतिहासात महत्त्वाचा मानला जातो. याच काळात गुणाढ्याच्या बृहत्कथेचा जीर्णोद्धार काश्मीरच्या सोमदेवाने कथासरित्सागराच्या रुपाने केला. जागतिक कथा वाङ्मयावर याचा फार मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. याच दरम्यान १० व्या शतकात ब्रह्मदेशात प्रथम लिपी अस्तित्वात आली आणि बौद्ध भिक्षूंनी जगाच्या इतर भागात जातककथा लिहून काढल्यामुळे, ज्या जातककथा पूर्वी प्रादेशिक स्वरूपात धर्मप्रचाराचा भाग म्हणून मौखिक स्वरूपात पाच-सात शतके फिरत होत्या. त्यांचे संस्करण होऊन ब्रह्मी कथावाङ्मयाचा सर्वात प्रमुख विभाग म्हणून जातककथांचे स्थान त्या देशात दृढमूल झाले. याच सुमारास आपल्या भारतात बऱ्याच पुराणकथांचे संस्करण झाले. परिणामी पाश्चात्य अभ्यासक थिओडोर बेनफे, कॉस्किन, मॅक्समूलर यांनी भारतीय लोककथा या जागतिक लोककथांचे उगमस्थान असल्याचा सिद्धांत मांडला. जरी ही बाब आपल्या राष्ट्रवादी अस्मितेला सुखावणारी असली, तरी नंतर स्कॉटलंडचा मानववंशशास्त्रज्ञ अँड्र्यू लँग याने मॅक्समूलरसह सर्व अभ्यासकांची मते तर्कशुद्ध, अभ्यासपूर्ण विवेचनाने खोडून काढली ही वस्तुस्थिती नजरेआड करता येत नाही.

लोककथांच्या भारतीय व पाश्चात्य अभ्यासकांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोककथांचे मौखिक परंपरेतून पिढ्यान्पिढ्या होणारे संक्रमण, त्यांचे देशोदेशीचे भ्रमण, आदिम अनुभूती प्रकट करण्याची लोककथांची प्रवृत्ती या वैशिष्ट्यांना केंद्रीय स्थान देऊन लोककथांच्या मुख्यत्वेकरून वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक अभ्यास सिद्ध केला आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी-विशेषतः भारतीय अभ्यासकांनी-लोककथांचा उगम यज्ञयागाशी संबंधित विधिकरणातून झाला असावा असा निष्कर्ष काढला आहे. यज्ञ आणि त्यांचे विधी धर्माची आविष्कारक रूपे आहेत. प्रागैतिहासिक काळी मानवाचा मनुष्य म्हणून विकास होण्याच्या काळात धर्मसंस्थेच्या उगम झाला नव्हता. शेतीचा शोध लागलेला नव्हता. टोळ्यांनी जगणाऱ्या माणसाचे उपजीविकेचे एकमेव साधन शिकारीतून मिळणारे पशु-प्राण्यांचे मांस हेच होते. अशा काळी शिकारीत पारंगत असणारा टोळीतला माणूस शिकारीचे रोमहर्षक अनुभव टोळीतल्या इतरांना सांगत असावा. या शिकारविषयक हकिकतींना उत्कंठावर्धक रूप देण्याच्या प्रयत्नांतून शिकारकथा आकाराला आल्या असाव्यात. या शिकारकथा लोककथेचे उगमस्थान उरू शकतात का, याचा शोध घेण्यासाठी प्रागैतिहासिक काळातील आदिम रानटी माणसाच्या मनातील कल्पनाबंधाचा शोध घ्यावा लागतो. तो आदिबंधात्मक समीक्षा पद्धतीने घेता येऊ शकतो या गृहितकाच्या आधारे लोककथेचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केला आहे.

- २ -

लोककथांचा अभ्यास करणाऱ्या बहुतेक अभ्यासकांनी 'गोष्ट सांगणे' आणि 'गोष्ट ऐकणे' या मानवाच्या मूलभूत आणि आदिम प्रेरणा आहेत हे मान्य करून लोककथांचे स्वरूप आशयसूत्रे, संरचनापद्धती याबद्दलचे विवेचन केले आहे. कथनपरतेच्या आदिम प्रेरणेतून निर्माण झालेल्या लोककथांचा आधुनिक साहित्यातील कल्पनाबंध, प्रतिमा, प्रतीके यांच्यावर पडलेला प्रभाव डॉ. तारा भवाळकर, डॉ. म. सु. पाटील, राजीव नाईक, डॉ. एकनाथ पगार इ. अभ्यासकांनी उलगडून दाखवला आहे. मानवाच्या ठिकाणी असणाऱ्या कथनपरतेच्या आदिम प्रेरणेतून लोककथा काळावर मात करून आधुनिक साहित्यात कशा झिरपत जातात हे या अभ्यासकांच्या विवेचनातून स्पष्ट होते. या लोककथा गतिमान लोकजीवनाशी समांतरपणे बदलत जातात. त्या कथांचा आशय, तपशील बदलतो. पण या कथांचा गाभा असलेला कल्पनाबंध (Motif) मात्र टिकून असतो. तो युगायुगातून प्रवास करतो. गतिमान लोकजीवनातील बदलांबरोबर लोककथांही बदलत जात असल्यामुळे लोककथांच्या संहिताचे स्वरूप लवचिक, चल व खुले असते.[२]

मनुष्यप्राण्यातील कथनपरतेच्या आदिम प्रेरणेचे स्वरूप विशद करताना फ्रेडरिक जैमिसनने असे मत मांडले आहे की, मनुष्यप्राण्याला त्याच्या भोवतालचे जग, निसर्ग, वास्तव यांची अनुभूतीच मुळी कथात्म रूपात येते. वस्तूचे, सृष्टीचे अस्तित्वभानाचे संवेदन कथात्म रूपात येते. उदाहरणार्थ, हे झाड आहे. ते आपल्याला सावली, फळे देते. हा हिंस्त्र प्राणी आहे. त्यापासून आपणास प्राणभय संभवू शकते. 'काही तरी' असल्याची जाणीव होणे, तिचे आपल्या जगण्याशी कार्यकारण भावाने जोडले जाणे, हे जाणवलेले इतर माणसांच्या निदर्शनाला आणून द्यावे असे उत्कटतेने वाटणे या संवेदनस्वभावातून कथनपरतेचा उगम होतो. प्राचीन काळी आपल्याला जाणवलेले जगाचे, वास्तवाचे संवेदन माणूस इतरांना उपलब्ध असलेल्या संवादमाध्यमांच्या साह्याने निदर्शनाला आणून देत असावा. पुढे जैमिनस असे म्हणतो की, कथनपरतेच्या जाणिवेशिवाय बाह्य जगाचे आकलन मानवी बुद्धीला अशक्य आहे. त्याने दुसरा एखादा पर्याय निवडला तरी तो पर्याय कथनपरतेच्या जवळपासच जाणारा असतो. कथनपरता हाच मनुष्यमात्राच्या वास्तवाच्या स्वीकाराचा आकृतिबंध असतो. हा आकृतिबंध मनुष्य सतत बदलत जाणाऱ्या बाह्य वास्तवाच्या मूळ स्वरूपावर आरोपित करतो.[३] जैमिसनच्या विवेचनावरून मनुष्यमात्राच्या ठिकाणी असलेल्या कथनपरतेच्या आदिम प्रेरणेची संगती लागते.

मानवी संस्कृतीच्या आरंभापासून ते लिपीचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शोध लागेपर्यंतचा कालखंड हा प्रागैतिहासिक किंवा अश्मयुगीन कालखंड म्हणून संबोधला जातो. या कालखंडात म्हणजे इ.स. पूर्व ३० हजार वर्षांपर्यंत मानव 'माणूस' म्हणून प्राथमिक अवस्थेत होता. या काळात शेतीचा शोध लागलेला नसल्याने शिकार करून व रानातील कंदमुळे यावरच तो गुजराण करीत असे. आदिमानवाच्या जीवनरहाटीने प्रगतीच्या दिशेने प्रवास सुरू केला. या ऐतिहासिक विकासक्रमात मानवाच्या ठिकाणच्या सामूहिक अचेतनातून जाणिवेचा उदय होऊ लागला. या जाणीवनिर्मितीसाठी आवश्यक असणारी स्वात्मतेची किंवा अहंतेची, आत्मजाणिवेची भावना मनुष्यप्राण्यात हळूहळू विकसित होऊ लागली.४ या जाणिवेतूनच शिकारकलेत प्रवीण असणाऱ्या आणि शिकारीचे रोमहर्षक अनुभव गाठीशी असणाऱ्या वीरपुरुषाला टोळीतील शिकारकलेत प्रावीण्य नसलेल्या इतरांपेक्षा आपण वेगळे आहोत, श्रेष्ठ आहोत असे जाणवले असावे. शिकारकलेतील प्राविण्यामुळे टोळीतील वीरपुरुषाचे श्रेष्ठत्व, नेतृत्व टोळीतील इतरांनी मान्य केले असावे. टोळीतील इतरांना 'शहाणे' करून सोडण्याच्या हेतूने त्याने शिकारीचे अनुभव टोळीतल्या इतर लोकांना सांगण्याचे प्रयत्न केले असावेत. या अनुभवामध्ये शिकारकलेशी संलग्न प्राणीसृष्टी, जंगले, वेगवेगळे ऋतू आणि त्यांचा शिकारकलेशी असणारा संबंध यांचा समावेश असावा. भाषेचा शोध लागण्यापूर्वी आदिमानवाचे गुहांमधून शिकारीच्या, हत्यारांच्या ओवडधोबड चित्रांतून हे अनुभव ढोबळपणे आविष्कृत झाले. या कलांचे उद्दिष्ट शिकारीची रोमहर्षकता आविष्कृत करण्याचीच होती. शिकार ही बाब आदिमानवाच्या जाणिवेच्याच केंद्रस्थानी होती याचा ही चित्रे निर्देश करतात.

भाषेचा शोध लागल्यानंतर टोळीतला वीरपुरुष आपले शिकारीचे अनुभव टोळीतल्या इतरांना उपलब्ध असलेल्या ओबडधोबड भाषेतून सांगू लागला असावा. तेथेच लोककथांच्या मौखिक परंपरेचा उदय गृहित धरता येऊ शकतो. सांगितल्या जाणाऱ्या शिकारीच्या अनुभवांना कथांचे रूप कसे आले असावे याचाही सुसूत्र वेध घेता येऊ शकतो. शिकार करतानाची रोमहर्षकता, त्यातील जीवघेणा संघर्ष, जगण्यासाठी मदत करणारी पशुसृष्टी, निसर्ग, जंगलातील वृक्षवेली यांच्याबद्दलचा कृतज्ञताभाव, प्राणघातक, हिंस्त्र पशूंबद्दलचा भयगंड आणि जगण्यासाठी व प्राणसंरक्षणासाठी साह्यकारी असणाऱ्या ओवडधोवड हत्यारांबद्दलचा पूज्यभाव ही शिकारकथेच्या अनुभवांची आशयसूत्रे असावीत.

शिकारीचे अनुभव भाषेतून मांडण्याला प्रारंभ झाला तेव्हा सांगणारा व ऐकणारा असे नाते टोळीतील लोकांमध्ये निर्माण झाले असावे. सांगणाऱ्याला आपले सांगणे टोळीतील इतरांनी लक्षपूर्वक ऐकावे, त्यांनी प्रभावित व्हावे या दृष्टीने काही क्लृप्त्या योजाव्या वाटल्या असतील. त्यातून घटनाप्रधानता, नाट्यपूर्णता, रोमहर्षकता, उत्कंठावर्धकता, निवेदनतील लालित्य, अद्‌भुतरम्यता, कल्पनारम्यता या कथेच्या वैशिष्ट्यांचा समावेश शिकारींच्या अनुभवांच्या कथनात झाला असावा. येथेच शिकारीच्या अनुभवकथनाला कथारूप लाभले असावे. टोळीतील ऐकणारे इतर नंतर या शिकारकथा आपल्या दृष्टीतून नंतरच्या पिढ्यांना सांगत असावेत. त्यामुळे मूळ कथेच्या आशयसूत्रात, संरचनेत स्थित्यंतरे होत गेली असावीत. अनुभवकथन करणाऱ्या आदिम शिकारी पुरुषाला टोळीतील समोरील श्रोत्यांच्या बौद्धिक कुवतीचा, आकलन-क्षमतेचा अंदाज घेऊन कथारूपे सिद्ध करावी लागली असावीत. त्यातून ढोबळ घटनाप्रधान रचनाबंध, नैसर्गिकता व स्वाभाविकता ही वैशिष्ट्ये लोककथेत आली. सृष्टीरुपांचा शोध आणि शिकारीच्या रोमहर्षक उत्कंठावर्धकतेतून अद्‌भुतरम्यतेचा, रंजकतेचा कथेत प्रवेश झाला असणार हे उघड आहे.

या सर्व विवेचनाचे उद्दिष्ट हे की, लोककथांचा उगम यज्ञ व त्याच्याशी संबंधित विधीपासून आदिमानवाच्या शिकारकथांपर्यंत मागे नेता येतो. पूर्वी टॉयलर व लँग या अभ्यासकांनी उत्तर-जीवित्ववादी संप्रदायाची (Survival Theory) मांडणी करताना दैवतकथांचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की, मूळच्या कथा या रानटी लोकांत आढळतात आणि त्यांचेच अनुच्छेदित जिवंत अवशेष

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुसंस्कृत लोकांच्या मागाहून बनलेल्या कथांत आढळून येतात.[५] प्रख्यात मानववंशशास्त्रज्ञ अॅन्ड्रयू लँग याने रानटी जातीची संस्कृती हीच आपल्या प्रगल्भ संस्कृतीचा आधार आहे असे मानून मानवशास्त्रातल्या देवकवादाचा (Totemism) अभ्यास सिद्ध केला.[६] हे सर्व अभ्यास लोककथांचा उगम रानटी जमातीपासून झाल्याचा निर्देश करतात.

शिकारी संस्कृतीतील आदिमानवाने सृष्टीतील जीवनधारणेला अनुरूप वस्तूंना धन (Positive) रूप देऊन व प्रतिकूल वस्तूंना ऋण (Negative) रूप देऊन दैवतकथांची (Myth) निर्मिती केली. या दैवतकथांतून पुढे लोककथेमध्ये सुष्ट-दुष्ट आकृतिबंध निर्माण झाला. या दैवतकथा समूहमनाच्या अबोधावस्थेतील स्वप्नांचे प्रतिरुपण करतात. लोककथेच्या वाङ्मयीन संहितेत व्यक्तिनिष्ठ अनुभव आणि संस्कृतिसंचितातील मानवी अनुभव यांच्यातील सलगता प्रस्थापित करण्यासाठी दैवतकथांचा उपयोग केला जातो. या दैवतकथा मुख्यत्वेकरून मानवाच्या व सृष्टीच्या उत्पत्तीविषयी, नियतीविषयी असतात. प्राचीन कथनपरंपरेतून येणाऱ्या या दैवतकथांना समाजमान्यता असते. अनेकसंदर्भसूचकत्व आणि मानवी जाणिवेच्या भूतकालीन अनुभवांशी नाते हे दैवतकथांचे वैशिष्ट्य सांगता येईल. या दैवतकथांची निर्मिती बव्हंशी पुढील हेतूंतून झाल्याचे दिसून येते - निसर्गाचे स्पष्टीकरण करण्यासाठी, गुढांचे स्पष्टीकरण करण्यासाठी, जगातले बदल स्पष्ट करण्यासाठी, नीतिनियम स्पष्ट करण्यासाठी, ऐतिहासिक बदल करण्यासाठी व टिकविण्यासाठी.

या कथांतील आशयसूत्रांवरून नीतिकथा, बोधकथा, चातुर्यकथा, उत्पत्तिकथा, नक्षत्रकथा, परीकथा, दंतकथा, प्राणिकथा, अद्भुतकथा अशी वर्गीकरणे करून त्यांच्याबद्दलचे अभ्यास सिद्ध करण्याचे प्रयत्न झाले आहेत.

- ३ -

उपलब्ध असलेल्या लोककथांच्या स्वरूपाचा अभ्यास करताना लोककथेतील आशयसूत्रांची संरचनापद्धती, लोककथेच्या सादरीकरणाची तंत्रवैशिष्ट्ये यांचा विचार आवश्यक ठरतो. या सर्व घटकांवर लोककथेची निर्मिती करणाऱ्या आदिम शिकारी संस्कृतीतील कथानिवेदकाच्या अनुभवप्रक्रियेचा अपरिहार्यपणे परिणाम झाला असावा. म्हणून आदिम कथानिवेदकाच्या अनुभवांचे स्वरूप पाहिले पाहिजे.

द. ग. गोडसे यांनी आदिम कथानिवेदकाच्या अनुभवप्रक्रियेचे विवक्षित वैशिष्ट्य स्पष्ट केले आहे.[७] त्यांच्या मते, आदिम मानवाची अनुभव स्वीकाराची पद्धती तर्कानुसारी नसते, तर ती प्रत्ययानुसारी असते. एखादी वस्तू किंवा घटना जशी भावली, प्रत्ययाला आली त्या रुपातच ती अनुभव म्हणून स्वीकारली जाते. अनुभवाचे साकल्यरुपाने प्रतीत होणारे ते एकसंध, भावमात्र रूप असते. त्यात तपशिलाचा वेगळा असा प्रत्यय नसतो. म्हणून आदिमानवाकडून वास्तवाचे दिसणारे पार्थिव रूप टिपण्याचा तर्कनिष्ठ व्यवहार घडत नाही. या अनुभव प्रक्रियेचा लोककथांच्या आशयसूत्रांवर सखोल परिणाम झाला. फँटसीतील अद्भुतरम्यता कथांतर्गत वास्तवात सुसंगत ठरली. कथानिवेदकाला सृष्टीतील चेतन-अचेतनावर मानवी भावनांचे आरोपण करण्याचे तंत्र उपलब्ध झाले. त्यातून कथेतील कोल्हा, वाघ बोलू लागले. विविध पशुपक्ष्यांमध्ये मानवी पातळीवरील सुष्ट-दुष्ट संबंध प्रस्थापित करणे शक्य झाले. नॉर्थ इंडियन अमेरिकेतील अस्वल लोककथेतील अस्वलाचे स्त्रीशी योनीसंबंध प्रस्थापित होऊ शकले.[८]

मानव आणि प्राणीसृष्टीतील एकात्म रूपाचे लोककथेतील अवशेष धर्म या संस्थेचा उदय झाल्यानंतर दैवतांची जी सगुणरूपे निर्माण झाली त्यात दिसून येतात. उदा. गणपती, नृसिंह यांची रूपे.

प्रागैतिहासिक कालखंडातून मानवप्राणी बाहेर पडून प्रगत होऊ लागला, त्याच काळात सामूहिक अचेतनाच्या मनोवस्थेतून त्याच्या ठिकाणी जाणिवेचा उगम होऊ लागला. या जाणिवेसाठी अहंचे भान येणे आवश्यक असते अशी मीमांसा मानसशास्त्रज्ञांनी केली आहे. हा अहं प्रागैतिहासिक कालखंडातून बाहेर पडणाऱ्या मानवाच्या ठिकाणी जसजसा निर्माण

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होऊ लागला त्या प्रमाणात निसर्ग, प्राणीसृष्टी यांच्यापासून वेगळे होण्याची मानसिक प्रक्रिया या आदिमानवाच्या ठिकाणी घडून येऊ लागली. ही प्रक्रिया होत असतानाही अचेतनात, नेणिवेत असणाऱ्या अबोध स्मृतींच्या अवशेषामुळे त्याची सृष्टीतील चराचरांशी एकात्मता टिकून होती. या प्रक्रियेतील मनुष्यप्राण्याचे इतर प्राण्यांपेक्षा असणारे वेगळेपण आयव्हर लिसनर या अभ्यासकाने आपल्या 'Man, God and Magic' या ग्रंथात विशद केले आहे.[९] त्याच्या विवेचनाचा सारांश असा की, प्राणी नजिकच्या वस्तुस्थितीला धरून असतो. पशू हा ठाम होकारात्मक (Positive) वागणारा असतो. तर माणूस हा वनस्पती व पशू यांच्याबद्दल पूर्ण भौतिकवादी नसतो. अन्न व शारीर गरजा त्याप्रमाणेच भौतिक सुखसोयी लाभल्या तरी तो सुखी नसतो. तसे सुखी होणे त्याच्या स्वभावातच नसते. माणूस स्वतः पलीकडे जाऊन बघत असतो. आधिभौतिकतेचा शोध घेत असतो. दैवी अस्तित्वाचा त्याला ध्यास लागलेला असतो. जीवनातले विनाशित्व ओलांडून तो शाश्वताकडे झेप घेत असतो. त्यातूनच देव आणि धर्म यांच्याकडे माणूस वळला.

मानवी जाणिवेच्या विकास प्रक्रियेत मानवाचे भौतिकतेतून आधिभौतिकतेकडे वळणे, त्याला दैवी अस्तित्वाचा ध्यास लागणे, शाश्वताचा वेध घेण्याची प्रेरणा निर्माण होणे या गोष्टींचा लोककथांच्या आशयसूत्रांवर आणि कथा निवेदकाच्या भूमिकेवर फार मोठा परिणाम झाला. शिकारीच्या शौर्यकथा, पशू, निसर्ग यांच्याशी मानवाचे ऐहिक नाते ही लोककथेची पूर्वीची आशयसूत्रे बदलली. सृष्टीच्या निर्मितीचे गूढ, देव ही संकल्पना लोककथेच्या आशयसूत्रात समाविष्ट झाली. सुष्ट-दुष्ट वृत्तीच्या विभागणीला देव व दानव हे परिणाम लाभले. आद्य अवस्थेतला कथानिवेदक मुख्यत्वे रंजनाची भूमिका बजावत होता त्यात उपदेशकाच्या, प्रवोधनकाराच्या प्रभावी भूमिकेची भर पडली. या स्थित्यंतरांच्या मुळाशी धर्म ही संस्था प्रचंड प्रेरक स्वरूपात होती. धर्म या संकल्पनेचा दृश्य आविष्कार यज्ञ व त्याच्याशी संबंधित विधिक्रियांतून होत होता. या विधिक्रियातून लोककथांचा उगम झाला असावा, असा निष्कर्ष लोकसाहित्याच्या अनेक अभ्यासकांनी काढला आहे.[१०] वेदवाङ्मयाची रचना या अभ्यासकांच्या निष्कर्षाला पूरक अशीच आहे. पण वेदांच्या रचनेपूर्वी प्रागैतिहासिक काळात भाषेचा शोध लागला तेव्हाही शिकारकथा अस्तित्वात असतीलच या तर्काला बाधा येत नाही. वेद वाङ्मयाच्या रचनापद्धतीवद्दल ऋग्वेदाच्या प्रस्तावनेत सायणाचार्य यांनी मंत्राच्या विनियोगाच्या दोन पद्धती सांगितल्या आहेत. त्या सामान्य विनियोग आणि विशिष्ट विनियोग या पद्धती होत. त्यापैकी सामान्य विनियोग या पद्धतीतील मंत्रांचा विधीशी काहीच संबंध नसतो. यातील मंत्राचे सूत्रसमूह साहित्यगुणांनी नटलेले असतात. त्यातील संदर्भ वा कथा वैचारिक आंदोलनासाठी उपयुक्त असतात. वेदपठण करणाऱ्या आणि ऐकणाऱ्या लोकांवरील मंत्रोच्चारणातील नादाचा प्रभाव जसा जसा कमी होऊ लागला त्या त्या प्रमाणात लोक कर्मकांडाकडून त्यातील अर्थाकडे, कथेकडे वळू लागले.[११] धर्म आणि कथा यांचा संबंध अतिशिथिलच नव्हे, तर बनावट असल्याचे निरीक्षण दुर्गा भावगत यांनी सांप्रदायिक धर्माच्या संदर्भात नोंदवले आहे.[१२] व्यक्तिनिष्ठ धर्मसंप्रदायात दैवतांना गौणत्व व धर्मसंस्थापकांना श्रेष्ठत्व अशी भूमिका घेतली जाते. या भूमिकेतून विचारांचे चक्र संस्थापकाच्या भोवती भ्रमत ठेवल्याने जुन्या आख्यायिकांमध्ये नवे आशय ओतले गेले व नवे व्यक्तिसंबंध जुळवले गेले. या प्रक्रियेत मूळच्या कथांचा विपर्यास केला गेला. बऱ्याच वेळा काल विसंगतीचा दोष या कथांमध्ये शिरलेला दिसून येतो हे दुर्गा भागवतांनी 'चंद्रावरील डाग' या उत्पत्तिकथेच्या आधारे दाखवून दिले आहे. ही उत्पत्तिकथा वेगवेगळ्या देशांमध्ये, वेगवेगळ्या सांस्कृतिक पर्यावरणात निर्माण झाली आहे. कोकणातल्या मुसलमानांमध्ये महंमद पैगंबराच्या घोड्याच्या खुरांचा प्रहार होऊन चंद्रावर डाग पडला अशी आख्यायिका आहे. रशियत लोककथेत ख्रिस्तवधाच्या वेळी नाइटिंगेल रडला म्हणून त्याला सुस्वर आवाजाची देणगी मिळाली, त्याच वेळी चिमणीने चहाडी केली म्हणून ती तिरस्करणीय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झाली असे सांगण्यात येते. वास्तविक दोन्ही उदाहरणांमध्ये महंमद व ख्रिस्त यांच्यापूर्वी हजारो वर्षे चंद्र व चिमण्या निर्माण झाल्या होत्या. परंतु धर्मसंस्थापकांना केंद्रस्थानी ठेवून लोककथांची निर्मिती करण्याच्या प्रवृत्तीमुळे लोककथांमध्ये कालविसंगती निर्माण झाल्याचे आढळून येते. तरीही धर्म आणि लोककथा यांचा निकटतम संबंध महत्त्वाचा आहे. अतिशयोक्तीचा दोष पत्करून धर्म आणि लोककथा यांचा संबंध सयामी जुळ्यांसारखा आहे असे म्हणावेसे वाटते. धर्माचे मूलस्रोत दोन प्रकारचे असतात. पहिला : जे काही आहे ते समजून घेण्याची इच्छा, दुसरा : धर्माचे सामाजिक स्वरूप. व्यक्तीच्या सामाजिकतेचे प्रतिबिंब लोकसाहित्यातून पडते. त्यामुळे लोकसाहित्य व धर्म यांचे संबंध अभिन्न स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. दृष्टान्तकथा, उत्पत्तिकथा यांची प्रेरणा धर्म या संस्थेतच असल्याचे दाखवून देता येते. दृष्टान्ताचा उपयोग धार्मिक वृत्ती जागृत करून त्या त्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी होत असतो. भारतातले प्राचीन वेदवाङ्मय, बौद्ध व जैन वाङ्मय विशिष्ट कथांप्रमाणेच दृष्टान्तांनी भरलेले आहे. 'मधुबिन्दुदिपुमान' या दृष्टान्ताचा उपयोग जगभराच्या वाङ्मयात झाला आहे. या दृष्टान्ताचा सर्वात प्राचीन आविष्कार महाभारतातल्या स्त्रीपर्वाच्या अध्याय ५, ६ मध्ये दिसून येतो. तो बौद्ध, जैन, मुसलमानी, ख्रिस्ती ग्रंथातही आढळून येतो.[१३] ही दृष्टान्त कथा अशी एकदा एक व्यापारी चोरांनी लुटल्यामुळे जंगलात भरकटला. त्याच्यावर एक हत्ती धावून आला. त्याला चुकविण्याच्या प्रयत्नात तो जुनाट विहिरीजवळ पोहोचला. त्या विहिरीत माणसाने उडी घेतली. विहिरीच्या काठावर वडाचे झाड होते. त्यावर मधमाश्यांचे मोहोळ होते. वडाची मुळे विहिरीत उतरली होती. त्या मुळांना धरण्याच्या प्रयत्नात असताना त्या माणसाच्या डोक्याला हत्तीने स्पर्श केला. विहिरीच्या तळातून त्याला गिळायला अजगर आणि विहिरीच्या चारी बाजूंनी चार सर्प धावायला आले. दोन उंदीर, एक पांढरा व एक काळा असे वडाची मुळे कुरतडू लागले. हत्ती सावज निसटल्यामुळे चिडून झाड हलवू लागला. त्या बरोबर माशा चिडल्या व त्याला चावल्या. इतक्यात मोहोळ तुटले व मध त्या माणसाच्या डोक्यावर सांडून त्याच्या तोंडात ओघळून आला. सर्व संकटे विसरून तो माणूस मध गोडीने खाऊ लागला.

या दृष्टान्ताची फोड अशी माणूस म्हणजे संसारी माणूस, जंगल म्हणजे जग, हत्ती म्हणजे मृत्यू, विहीर म्हणजे मानवी जीवन, अजगर म्हणजे नरक, चार सर्प म्हणजे वासना, वडाचे मूळ म्हणजे मनुष्याचे आयुष्य, उंदीर म्हणजे शुक्ल व कृष्ण पक्ष, मधमाश्या म्हणजे दुःख किंवा चिंता, मध म्हणजे विषयसुखे.[१४]

प्रचलित कथांना मुरड घालून दृष्टान्तरूप द्यायचे - विशेषतः पंचतंत्रासारख्या पुस्तकातल्या बोधकथांना दृष्टान्तरूप द्यायचे ही प्रक्रिया सर्व धार्मिक संप्रदायांमध्ये दिसून येते. महानुभाव वाङ्मयात शेणाच्या घराच्या कावळ्याची व मेणाच्या घराच्या चिमणीची कथा रंगवली आहे. पंचतंत्रातलीच विहिरीत स्वतःचे प्रतिबिंब पाहून उडी घेणाऱ्या सिंहाची कथा ज्ञानेश्वरीत दृष्टान्त म्हणून सांगितली जाते.

लोककथांच्या निर्मितीच्या मुळाशी गोष्ट सांगणे हीच मूलभूत प्रेरणा असते. धार्मिक, नैतिक, रंजन, बोध असे कोणतेही हेतू असले तरी मूलतः घटनाक्रमांनी युक्त शाश्वततेकडे जाणाऱ्या मूल्यांनी प्रेरित कथा सांगणे हे लोककथेचे आद्य उद्दिष्ट असते. या कथांचा गाभा - कल्पनाबंध वैश्विक असतो. चिरंतन शाश्वत मूल्यांनी भारलेला असतो. कथाविशेषांचे तपशील त्या त्या प्रदेशातील धार्मिक, नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी सिद्ध झालेले असतात. या कथेतील वास्तव पार्थिक किंवा दर्शनी वास्तवाने सिद्ध झालेले नसते; तर लोककथेचा कथा निवेदक कथेतील घटनाक्रमांना सुसंगत ठरेल असे कल्पित वास्तव निर्माण करतो. या वास्तवाचा प्रत्यक्षातील वास्तवाशी वास्तवाशी संबंध नसतो. या कथेतील घटना मानवी जीवनातील स्वाभाविक प्रेरणानुसारी घडलेल्या वाटल्या तरी त्या प्रेरणा केवळ मानवी नसतात तर त्या निसर्ग व्यवहाराच्या मूळ प्रेरणा असतात. या प्रेरणांनाच कल्पनाबंध (Motif) असे संबोधले जाते. हे कल्पनाबंध चिरंतन, वैश्विक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निसर्गव्यवहारातून आकाराला येतात. या कल्पनाबंधाशिवाय लोककथेची निर्मिती होऊ शकत नाही. केवळ अपवादात्मक घटनेवर लोककथा निर्माण होत नही. घटनेच्या म्हणजे कथा विशेषांच्या मुळाशी कोणते तरी सृष्टीमान्य वळण अथवा वहिवाट असल्याशिवाय अत्यंत महत्त्वाची अपवादात्मक घटना सुद्धा लोककथा निर्माण होण्यासाठी प्रेरक ठरू शकत नाही.[१५] एकाच कल्पनाबंधातून भौगोलिक, सांस्कृतिक परिस्थितीप्रमाणे अनेक लोककथा निर्माण झालेल्या दिसून येतात. हे कल्पनाबंध कथावस्तूत सुश्लिष्ट, एकजीव झालेले नसून दुर्विणीतील (Kaladeoscope) काचा दर हलण्याबरोबर निरनिराळ्या आकृती निर्माण करतात. त्याचप्रमाणे कल्पनाबंध विविध प्रकारे एकत्र जमले की, विशिष्ट कथाविशेष तयार होतो.[१६] उदा. आपल्याकडील ब्रह्मा सटवींची लोककथा आणि इडिपसची प्राक्कथा किंवा रायगड परिसरातील संभाजी - गोदावरी दंतकथा आणि गुजराथेत प्रचलित असलेली चंद्रगुजरी आणि बे - गडा महंमद यांची कथा. थोडक्यात विविध प्रदेशात आणि वेगवेगळ्या भाषांमध्ये निर्माण होणाऱ्या लोककथांच्या निर्मितीच्या प्रेरणा कल्पनाबंधच (Motif) असतात. हे कल्पनाबंध लोककथेच्या निर्मात्याकडून कशा रूपात लोककथेतून आविष्कृत होतात, या कल्पनाबंधाच्या प्रेरणा कोणत्या असतात याचा शोध आदिबंधात्मक समीक्षापद्धतीचा अवलंब करून घेता येऊ शकतो.

- ४ -

युंग या मानसशास्त्रज्ञाने मानवी नेणिवेचे व्यक्तिगत अबोध मन (Personal unconsious) व सामूहिक अबोध मन (Collective unconsious) असे दोन प्रकार मानले आहेत. त्यापैकी अबोध मन म्हणजे आदिमानवाच्या काळापासून साठत आलेल्या संस्काररूप अनुभवांचा प्रचंड कोश होय. या कोशातील मानसिक घटकांना विशिष्ट प्रकारच्या आदिम प्रतिमेत संघटित करणाऱ्या घटकांना 'आदिबंध' असे म्हटले जाते. या घटकांना आदिबंधाच्या मुशीतून ज्या आदिम प्रेरणेतून आविष्कृत केले जाते त्यांना आदिबंधरूप प्रतिमा म्हटले जाते. स्त्री-पुरुष, माता-आदिमाता, घर-गुहा, वृक्ष-पक्षी, देव-दैत्य, राक्षसिणी-चेटकिणी इ. च्या आदिबंधरूप प्रतिमा स्वप्ने, मिथस्, दृष्टान्त, साहित्यादी कला यांच्यामधून प्रकट झालेल्या दिसून येतात. त्या प्रतिमा मानवाच्या पूर्वजांच्या अनुभवांना विशिष्ट रूप देत आल्या आहेत.[१७]

आपल्या अनेक लोककथा पाहिल्या तर त्यातील राजाला दोन राण्या असतात. त्यापैकी एक आवडती असते, दुसरी नावडती असते. या दोन राण्या म्हणजे प्रेयस व श्रेयस यांची प्रतीके असतात. या लोककथा श्रेयस आणि प्रेयस यांच्यातील संघर्षाकडे अंगुलीनिर्देश करतात. या दोहोंचा समन्वय साधण्याचा संभ्रम ही मानवाची मूलभूत प्रवृत्ती असते. ज्यांना हा समन्वय साधता येत नाही, त्यांचे व्यक्तित्व खंडित होते. लोककथांमधील अनेक राजे खंडित व्यक्तित्वाचे प्रतीक असतात. चेतन पातळीवर जगत असताना ते राजा या नात्याने भूमिका वठवत असतात. या भूमिकेशी एकरूप होताना ते स्वतःचा प्रकृतीधर्म विसरतात. म्हणजेच त्यांचा अचेतन मनापासून संबंध तुटतो. त्यांचे आवडतीच्या सान्निध्यात जगणे म्हणजे केवळ चेतन पातळीवर जगणे असते. असे जगणे अर्धवट असते. त्यामध्ये निर्मितीक्षमता नसते. निर्मितीचे बीज अचेतनाच्या कुशीत फुलते. या राजांचा नावडतीशी म्हणजे अचेतनाशी संबंध तुटल्यामुळे अनेक राजे अपत्यहीन असतात. अपत्यप्राप्तीसाठी त्यांना यज्ञयाग किंवा तपश्चर्या करावी लागते. हे विधी म्हणजे अचेतनाशी तुटलेला संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याचे प्रयत्न असतात. या प्रयत्नात त्यांच्या हाती एखादे फळ येते. त्याचे भाग दोन्ही राण्यांच्या वाट्याला येतात त्यापैकी नावडतीच्या वाट्याला येणारा भाग काहीसा निकृष्टच असतो. दोघींना जी मुले होतात त्यातील आवडतीची मुले अनेकदा नाकर्तीच निपजतात. ही चेतन पातळीवरील निर्मिती असल्याने त्या मुलांमध्ये सहजप्रवृत्तिमूलक शहाणपणाचा अभाव असतो. नावडतीची मुले अचेतन मनाच्या पातळीवरून चेतनेच्या पातळीवर येणाऱ्या जाणिवेच्या अंकुरासारखी असतात. पिता जिवंत असतानाही त्यांचे जिणे पितृविहीन असते. ती मातेच्या संपर्कात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाढतात. ती अंधाऱ्या अचेतनाची अपत्य असल्यामुळे त्यांना आरंभी तरी अडखळत जगावे लागते. त्यांच्यात उपजत सहजप्रवृत्तिमूलक शहाणपण असते. वयात येतांना ते प्रकट होऊ लागते.

यौवनात प्रवेश करताना ही मुले प्रकाशसन्मुख होतात. अचेतनाशी संपर्क न तोडता त्याला आपल्यात सामावून घेतात आणि चेतनाच्या पातळीवर येण्याचा कष्टदायक, अवघड प्रयत्न करतात. त्यासाठी नानाविध धोके पत्करतात. या यात्रेत त्यांना सात अरण्ये किंवा सात समुद्र पार करावे लागतात. अनेकदा त्यांना या प्रवासात हिंस्त्र पशू, क्रूर राक्षस, काळ्याकुट्ट चेटकिणी, भयानक अजगर, प्रचंड वादळे यांच्याशी लढावे लागते. तेथील सात अरण्ये किंवा सात सागर ही अचेतन मनाची किंवा मातृप्रदेशाची प्रतीके असतात. पशू, राक्षसे, चेटकिणी वगैरे या प्रदेशातील प्रतिकूल सहजप्रवृत्तीची प्रतीके होत. अशी प्रतीके ही अचेतनाच्या वा रुद्रमातेच्या आदिबंधाचा आविष्कार करतात. ज्या अचेतनातून ही मुले जन्माला येतात त्याच अचेतनाची अपत्ये म्हणून पशू, राक्षस वगैरे या प्रदेशात वावरत असतात. आपल्याच प्रदेशात जन्माला आलेल्या या मुलांचे चेतनाच्या परप्रांतात जाणे त्यांना आवडत नाही. म्हणून रुद्रमातेचे प्रतिनिधी या नात्याने या मुलांच्या मार्गात नाना प्रकारचे अडथळे निर्माण करतात. या मुलांसाठी रुद्रमातेच्या प्रतिनिधींशी झगडणे हा जीवनमरणाचा प्रश्न असतो. अशा कठीण परिस्थितीत एखादा पांढऱ्या दाढीचा साधू, मांत्रिक भेटतो. तो मार्गदर्शन करतो. शत्रुपक्षाची रहस्ये सांगतो. अनेक लोककथांमध्ये असे गुरू वेगवेगळ्या रूपात भेटतात. त्यांच्यात समान आकृतिबंध असतो. ही रूपे वृद्ध आप्ताच्या आदिबंधाची आविष्कारक असतात. परीकथांमध्ये मदत करणाऱ्यांमध्ये पशुपशी असतात.

या प्रवासात मुले विकसित होत जातात. त्यांना स्वतःच्या ठिकाणी असलेल्या शक्तीचा साक्षात्कार होतो. प्रवासाच्या अखेरच्या टप्प्यावर त्यांना एखादी राजकन्या भेटते. ती सुद्धा अंधाऱ्या अचेतनाची रहिवाशी असल्यामुळे तिच्याभोवती एखादे रहस्य असते. ती कधी शापित असते, तिला कधी पक्ष्याचे, पशूचे, फुलाचे रूप लाभलेले असते. तर कधी कडेकोट बंदोबस्तामध्ये कैद भोगत असते. त्यामुळे तिची भेट निकराच्या संघर्षानंतरच संभवनीय असते. ते आपल्या वृद्ध आप्तांच्या साह्याने सगळ्या प्रतिकूल शक्तींवर मात करतात. आणि या सुंदर राजकन्यांची प्राप्ती करून घेतात. या राजकन्या सर्जनक्षम, यौवनसंपन्न स्त्रीच्या आदिबंधाची आविष्कारक प्रतीके होत. अशा राजकन्येच्या संपर्कात येताच हे नायक लोककथांमध्ये वीरनायकाच्या रूपात अवतरतात.

मातेपासून मुक्त झालेला वीरनायक एकतर पितृव्यवस्थेत सामील होतो वा बराच काळ पितृव्यवस्थेशी झगडतो. आदिबंधात्मक पितृप्रतिमा दुहेरीरुप धारण करताना दिसतात. त्यातील एक धनरुप आश्वासक पित्याचे असते. त्यामागे आत्मिक पित्याची वा उत्पत्तिकर्त्या परमेश्वराची आदिबंधात्मक प्रतिमा असते. पुराणकथेतील बरेच पिते या प्रतिमेत प्रकट होताना दिसतात. दशरथ, नंद या प्रकारच्या प्रतिमा म्हणता येतील. या प्रतिमेचे दुसरे रूप रुद्रपित्याचे असते. प्रल्हादाचा बाप हिरण्यकशप असा पिता म्हणता येईल. पितृप्रतिमा ही काळाबरोबर बदलणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांशी निगडित असते. माता ही जीवनाची मूलभूत प्राकृतिक मूल्ये जतन करते. तर पिता सांस्कृतिक मूल्यांचा सांभाळ करतो.१८

लोककथेतील कल्पनाबंधाची आदिबंधात्मक समीक्षापद्धतीने मांडणी केल्यास आदिम माणसाच्या मनाचा एक सलग नकाशा उपलब्ध होऊ शकेल आणि रानटी अवस्थेतील आदिम माणसांनी ज्या शिकारकथा सिद्ध केल्या असतील तेथपर्यंत जाऊन लोककथेच्या उगमाची ऐतिहासिक मांडणी करण्याच्या दिशेने प्रयत्न करता येऊ शकतील. त्या दिशेने हा प्राथमिक प्रयत्न केला आहे.

संदर्भ

१. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रुपरेखा (पृ. ९९)
२. डॉ. एकनाथ पगार : लोकसाहित्य व आधुनिक साहित्य (पृ. ५३)
३. गोपीचंद नारंग (अनु. डॉ. सूर्यनारायण रणसुभे) संरचनावाद, उत्तर संरचनावाद व प्राच्य काव्यशास्त्र

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(पृ. ४०२)
४. डॉ. म. सु. पाटील : आदिबंधात्मक समीक्षा (पृ. १२)
५. दुर्गा भागवत : लोकसाहित्याचे अंतःप्रवाह (पृ. ३३)
६. कित्ता : (पृ. ३०)
७. द. ग. गोडसे : लोकधाटी (पृ. २७)
८. डॉ. अरुण प्रभुणे : नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या अस्वल लोककथा (पृ. ५२)
९. दुर्गा भागवत : अस्वल (पृ. १२)
१०. डॉ. प्रभाकर मांडे लोकसाहित्याचे अंतःप्रवाह (पृ. ९१)
११. दुर्गा भागवत : धर्म आणि लोकसाहित्य (पृ. ५२)
१२. कित्ता : (पृ. ५५)
१३. कित्ता : (पृ. ६६)
१४. Hermann Jacobi : Introduction to Hemachandra's Parishya parva (P. 22-23)
१५. द. ग. गोडसे : ऊर्जायन (पृ. ५७)
१६. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रुपरेखा (पृ. ४२-४३)
१७. प्रा. गंगाधर पाटील : समीक्षेची नवी रुपे (पृ. ६९)
१८. डॉ. म. सु. पाटील : आदिबंधात्मक समीक्षा (पृ. ४२)

■ ■ ■

शुद्धिपत्र

युगवाणीच्या ऑक्टो-नोव्हें-डिसेंबर २००७ च्या अंकात काही मुद्रणदोष राून गेले आहेत. संपादकीयातील (शीर्षक 'प्रयोगशील') दुरूस्त्या अशा. कंसातील शब्द सुधारित
[ओळ ३ - लाकेशरण (लोकशरण) ओळ ७ - अस (असा)
ओळ १० - धुंदीत (धुळीत) ओळ १४ - अंगाच्या (अंकाच्या)]

लेखकांसाठी सूचना

१. लेखकांनी आपले साहित्य कागदाच्या एका बाजूने लिहून वा मुद्रित करून पाठवावे.
२. लेखनाच्या डाव्या बाजूस आवर्जून समास सोडावा.
३. लेखन सुवाच्य हस्ताक्षरात आणि शुद्धलेखनाचे अधिकाधिक नियम पाळणारे असावे.
४. लेखकाने आपल्या लेखनाची प्रत स्वतःजवळ ठेवावी. नापसंत लेखन परत पाठविणे शक्य होणार नाही.
५. लेखनाच्या स्वीकृतीसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे दोन महिन्यात कळविला जाईल.
६. लेखन अनुवादित वा रूपांतरित असल्यास मूळ लेखकाची व प्रकाशकाची संमती लेखी स्वरूपात जोडावी.
७. निर्णय कळविण्यासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टकार्ड लेखनासोबत पाठवावे.
८. नव्या लेखनाचे 'युगवाणी'त स्वागत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

।। मराठी गझलेतील जननिष्ठा एक शोध ।।

। डॉ. अविनाश सांगोलेकर

प्रस्तुत शोधनिबंधात प्रथम 'जननिष्ठा' ही संकल्पना स्पष्ट करून घ्यावयाची असून मग त्या पार्श्वभूमीवर मराठी गझलेचा धांडोळा घ्यावयाचा आहे. 'जननिष्ठा' ही संकल्पना जनसाहित्याशी संबंधित असल्याने जनसाहित्याच्या प्रवर्तकांची ह्या संकल्पनेबाबतची मते जाणून घेणे ही गोष्ट येथे आवश्यक ठरते.

जननिष्ठा म्हणजे काय ?

जनसाहित्य हा एक मराठी साहित्य क्षेत्रातील नवा विचार आहे. हा विचार प्रथम विदर्भातील प्रा. या. वा. वडस्कर ह्यांनी १९६८ च्या सुमारास मांडला. पुढे १९८८ मध्ये 'जनसाहित्याच्या दिशेने' ह्या त्यांच्या पुस्तकात हा विचार सविस्तरपणे व सूक्ष्मपणे व्यक्त झाला.[१] परंतु प्रा. वडस्करांच्या विचारांमधील काही भाग विदर्भातीलच डॉ. सुभाष सावरकरांना मान्य न झाल्याने त्यांनी त्यांची पुनर्मांडणी केली. १९९३ मध्ये आपली ही नवी मांडणी त्यांनी 'जनसाहित्य' ह्या पुस्तकात शब्दबद्ध केली.[२] पुढे २००३ मध्ये विदर्भातीलच डॉ. नीळकंठ गोपाळ मेंढे ह्यांचे 'जनसाहित्य चिंतन आणि चिकित्सा' हे पुस्तक प्रकाशित झाले.[३] अशाप्रकारे विदर्भ ही आद्य मराठी वाङ्मयाप्रमाणेच जनसाहित्याचीही जननी ठरते. डॉ. र. बा. मंचरकर जनसाहित्य का व कसे आले, हे स्पष्ट करताना म्हणतात, 'समकालीन परिवर्तनवादी नवप्रवाहांतील पुष्कळशा साहित्यातील संकुचितपणा, विभाजनवादी वृत्ती, आशयाचा किरटेपणा आणि कलादृष्ट्या जाणवणारा उणेपणा याची प्रतिक्रिया म्हणून जनसाहित्य पुढे आले. साहजिकच इ.स. १९८६८ ते १९८४ या आरंभकाळात परिवर्तनवादी नवा साहित्यप्रवाह अशा स्वरूपात त्याची संकल्पना मांडण्यात आली.''[४] पुढे अधिक विचारमंथन होत राहिले आणि आता तर असे मानण्यात येऊ लागले आहे की, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य ह्या साहित्यप्रवाहांप्रमाणे रूढ अर्थाने जनसाहित्य हा साहित्यप्रवाह नाही, तर ती एक विशिष्ट चळवळ आहे; एवढेच नव्हे, तर सर्व परिवर्तनवादी साहित्यप्रवाहांच्या मुळाशी जनसाहित्याचा प्रवाह आहे.[५] 'जनसाहित्य' ह्या संज्ञेतील 'जन' ह्या पदाचा संबंध प्रा. वडस्कर प्राचीन मानवी समुहांच्या तत्कालीन 'गण' ह्या संज्ञेशी जोडतात. परंतु डॉ. सुभाष सावरकर वेगळे मत मांडताना म्हणतात, ''जन म्हणजे जसे 'बहुजन' नव्हे; तसेच ते विशेषाधिकार प्राप्त 'महाजन' (= अभिजन) ही नव्हे ! 'जन' हे पद या ठिकाणी विविध जाती, वर्ण, वर्ग, जाती, गटांमध्ये विखुरलेल्या लोकसमष्टीचेच वाचक होय.''[६] डॉ. सतीश तराळ, जन, जनतत्त्व व जननिष्ठा ह्या संकल्पना स्पष्ट करताना म्हणतात, ''जन'' म्हणजे निखळ माणूस. तो धर्म, पंथ, वर्ण, वर्ग, जाती, लिंग आदि भेदांच्या पलीकडला 'माणूस' होय. 'जनतत्त्व' म्हणजे माणूसपण-मानवी सत्व...जननिष्ठा म्हणजे जनतत्त्वाच्या सामर्थ्यावरील निष्ठा होय. आत्मनिष्ठेचेच ते प्रगल्भ, विकसित रूप होय. जननिष्ठा ही अहंनिष्ठा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्यक्तिनिष्ठेच्या विरूद्ध असली, तरी आत्मनिष्ठेच्याच विकासातला तो पुढील टप्पा होय.''[७]

थोडक्यात, जनसाहित्य हे जननिष्ठेला साहित्यमूल्यांची जननी मानते. जनसाहित्य प्रणालीतून जननिष्ठा हा अभिनव मूल्यनिकष उदयास आला असून त्याचे वैशिष्ट्य हे की, तो ज्यावेळी जीवनमूल्यांचा द्योतक आहे, त्याच वेळी तो साहित्यमूल्यांचाही निर्वाह करणारा आहे. अशा प्रकारे जन म्हणजे निखळ माणूस हा जनसाहित्याच्या, पर्यायाने जननिष्ठेच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळे माणूस, माणूसपण, माणुसकी आदी बाबींबद्दलची निष्ठा म्हणजे जननिष्ठा होय, हे ओघाने आलेच.

मराठी गझलेतील जननिष्ठा

'गझल' हा मूळचा फार्सी कविताप्रकार असून तो अमृतराय (जन्म : इ.स. १६९८, मृत्यू : इ.स. १७५३) व मोरोपंत (जन्म : इ.स. १७२९, मृत्यू : इ.स. १७९४) ह्या दोन कवींनी प्रथम मराठीत हाताळला. तेव्हापासून म्हणजे अठराव्या शतकापासून आजतागायत अनेक कवींनी तो हाताळला आहे. माधव जूलियन (जन्म : इ.स. १८९४, मृत्यू : इ.स. १९३९) हे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील, तर सुरेश भट (जन्म : इ.स. १९३२, मृत्यू इ.स. २००३) हे उत्तरार्धातील महत्त्वाचे मराठी गझलकार होत. सध्या तर मराठीत २२५ हून अधिक गझलकार अधिकृतपणे पहावयास मिळतात. 'समग्र मराठी गझलेतील जननिष्ठेचा धांडोळा घ्यावयाचा, तर तो एका स्वतंत्र ग्रंथाचा वा पीएच.डी. प्रबंधाचा विषय होईल. म्हणून येथे अमृतराय व मोरोपंत हे प्रारंभीचे गझलकार, माधव जूलियन हे मधल्या काळातील मझलकार व सुरेश भट हे अलीकडच्या काळातील गझलकार अशा मोजक्या व मराठी गझलेच्या वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वाच्या गझलकारांच्या गझलांचा जननिष्ठेसंदर्भात धांडोळा घेऊन पाहू.

अमृतराय (जन्म इ.स. १७२९, मृत्यू इ.स. १७९४) हे आद्य मराठी गझलकार होत. साखरखेर्डे (ता. मेहकर, जि. बुलढाणा) हे त्यांचे जन्मगाव होय. त्यांच्या नावावर १७२ मराठी पदे आढळतात. 'जगव्यापका हरीला नाहीं कसें म्हणावें ?' हे त्यांचे पद माधव जूलियन (माधवराव पटवर्धन), डॉ. ना. ग. जोशी, प्रा. रमेश अ. तेंडुलकर व डॉ. अविनाश कांबळे (सांगोलेकर) ह्या अभ्यासकांनी गझल म्हणून गौरविले आहे. नऊ ओळींची ही गझल भक्तिपर असून तीत अद्वैतवाद व्यक्त झाला आहे. संपूर्ण जगाला व्यापून राहिलेला परमेश्वर ही वस्तुस्थिती असताना तोच जगात नाही, असे कसे म्हणावे, हा निरूत्तर करणारा प्रश्न ह्या गझलेत अमृतरायांनी उपस्थित केला आहे.

अमृतरायांनी मराठीत आणलेला 'गझल' हा कविताप्रकार पुढे ज्यांनी अतिशय आकर्षकपणे रूळवला, ते पंडितकवी मोरोपंत (जन्म इ.स. १७२९, मृत्यू : इ.स. १७९४) ह्यांच्या दोन पदांचा गझलदृष्टीने विचार वरील चारही अभ्यासकांनी केलेला आहे. 'रसने ! न राघवाच्या थोडी, यशांत गोडी' व 'हृदया ! बरें विचारीं। नाम स्मरें, न तापें' ही ती दोन पदे होत. अमृतरायांच्या गझलेप्रमाणेच मोरोपंतांच्याही ह्या दोन गझला छोट्याशा म्हणजेच सात-सात ओळींच्या असून शिवाय त्या भक्तिपरही आहेत. दोहोंमध्ये कमी-अधिक फरकाने नाममहिमाच वर्णिला असून शेवटी कोणते ना कोणते मागणेही मागितलेले आहे. कल्पनाचमत्कृती, सामासिक शब्द, आलंकारिकता, ह्या मोरोपंती काव्यविशेषांचा ह्या दोन्ही गझलांचे अमृतरायांच्या गझलेशी असलेले साम्य (अगदी दोषांच्या बाबतीतीलही) व मोरोपंतांनीही बारकाईने न्याहाळलेले अमृतरायांचे समग्र काव्यभांडार ह्या दोन गोष्टींच्या आधारे एक तर्क करता येणे शक्य आहे. तो असा की, 'जगव्यापका हरीला नाहीं कसें म्हणावें ?' ह्या गझलेच्या अनुकरणातून मोरोपंताच्या ह्या दोन गझला निर्माणा झालेल्या असाव्यात.

अमृतराय व मोरोपंत हे संतकवींप्रमाणे केवळ भक्त नव्हते किंवा केवळ भगवद्भक्तीतून काव्यनिर्मिती करीत राहिलेले कवीही नव्हते. उलट ते दोघे पेशाने कीर्तनकार होते, व्युत्पन्न असे पंडित होते, रंजनासाठी प्रयोग करणारे प्रयोगशील कवी होते, राजकारण व तीर्थयात्रा ह्यांच्या निमित्ताने उत्तरेकडील हिंदी भाषिक प्रदेशातून भ्रमण करणारे चोखंदळ प्रवासी होते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्याच वेळी उत्तरेकडे 'गझल' हा प्रकार राजेरजवाड्यांमधून, नाचगाणी चालणाऱ्या कोठ्यांमधून व सूफी साधुसंतांच्या मठांमधून जोरात फोफावलेला होता. तो काव्य आणि गायनाच्या अंगाने लोकप्रिय पावलेला होता. भक्तिपर पदे लिहिणाऱ्या ह्या मराठी कवींच्या गझलेतून भक्तिभाव व्यक्त करणारे सूफी साधुसंत प्रकर्षाने उत्तरेकडील प्रवासात पहायला-ऐकायला मिळाले असतील. पेशाने कीर्तनकार असलेल्या ह्या कवींना गझलेचे श्रोत्यांचे लक्ष वेधून घेण्याचे सामर्थ्य महत्त्वाचे वाटले असेल. गायनाचा छंद व ज्ञान असलेल्या ह्या कवींना गझलेतील गेयता, गायनानुकूलता, गायनातील सोपेपणा, चटकदारपणा ह्याही बाबींनी मोहित केले असेल. ह्या सर्वांच्या जोडीला उत्तरेकडील काव्यवाङ्मयाशी असलेला दोघांचा परिचय हीही बाब महत्त्वाची ठरली असेल.

'गझल' हा मूळचा फार्सी कविताप्रकार असून तो कालांतराने हिंदुस्थानात फार्सीबरोबरच उर्दूतही विलक्षण लोकप्रिय झाला. ह्या दोन्ही भाषांमधील गझलांमध्ये मद्याची व प्रेमाची धुंदी केंद्रस्थानी दिसते. अगदी सूफी साधुसंतांच्या भक्तिपर गझलांमध्येही हे दिसते. ह्या पार्श्वभूमीवर अमृतराय व मोरोपंत ह्या संतप्रवृत्तीच्या मराठी पदरचनाकारांच्या उपरोक्त तीन गझला मात्र सर्वार्थाने मराठमोळ्या वाटतात. त्यातून मराठी भाषेशी, समाजाशी, संस्कृतीशी, संतपरंपरेशी, संतकाव्याशी संबंधित जननिष्ठा व्यक्त झालेली पहावयास मिळते. शिवाय माणसाला भक्तिभावना ही एक प्रकारचे मानसिक बळ पुरवत असते, हे लक्षात घेता जननिष्ठेचे एक वेगळे रूप असून ह्या भक्तिपर गझलांकडे पहावयास हवे.

अमृतराय-मोरोपंत ह्यांच्यानंतरचा मराठी गझलेच्या वाटचालीतील दुसरा टप्पा म्हणजे माधव जूलियन (जन्म : इ.स. १८९४, मृत्यू : इ.स. १९३९) हे होत. 'गज्ञलांजलि' (प्रकाशनसाल : इ.स. १९३३) ह्या त्यांच्या प्रसिद्ध कवितासंग्रहातील सर्वच्या सर्व म्हणजे १०८ कविता व अन्य ६ कविता अशा एकूण ११४ कविता 'गझल' म्हणून संबोधण्यात आलेल्या आहेत. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, ह्यातील अत्यल्प कविता यशस्वी गझला म्हणता येतील, अशा आहेत. 'हट्टी प्रेम' व 'जीवघेणी लीला' ह्यांचा येथे प्रातिनिधिक यशस्वी गझला म्हणून विचार करायला हरकत नाही. ह्या दोन्ही गझला प्रेयसीला उद्देशून असून साहजिकच त्या प्रेमप्रधान अशा आहेत. पैकी 'हट्टी प्रेम' ही ९ द्विपदींची गझल 'वियद्‌गंगा' ह्या अग्न्यावर्तनी (सप्तमात्रक) अक्षरगणवृत्तात असून तिचे स्वरूप प्रियकराने प्रेयसीकडे केलेली प्रेमयाचना असे आहे. 'जीवघेणी लीला' ही दहा द्विपदींची गझल 'मेनका' ह्या अग्न्यावर्तनी (सप्तमात्रक) अक्षरगणवृत्तात असून तिचे स्वरूप प्रियकराने प्रेयसीकडे व्यक्त केलेले प्रेमभंगाचे दुःख असे आहे.

माणसाला जशी भक्तिभावना एक प्रकारचे मानसिक बळ पुरवत असते, तशीच प्रेमभावनाही हे बळ पुरवत असते. म्हणूनच भिन्नलिंगी प्रेमभावनेचा आविष्कार जगभर सर्व काळी, सर्व भाषांमधील कवितांमधून होत आलेला आहे. मराठी कविताही ह्याला अपवाद नाही. माधव जूलियन तर 'प्रणयपंढरीचे वारकरी'च होते. त्यांच्या गझलांमधून प्रेमभावनेचा धीटपूर्वक आविष्कार झालेला आहे. त्यांच्या उपरोक्त दोन गझला ह्या दृष्टीने पुरेशा बोलक्या आहेत. म्हणून जननिष्ठेचा एक वेगळाच पैलू ह्या गझलांमधून प्रत्ययास येतो, असे म्हणावयास हवे.

अमृतराय-मोरोपंत व माधव जूलियन हे मराठी गझलेच्या वाटचालीतील अनुक्रमे पहिला व दुसरा टप्पा होत. त्यानंतरचा तिसरा टप्पा सुरेश भटांच्या नावाने ओळखण्यात येतो. सुरेश भट (जन्म : इ.स. १९३२, मृत्यू इ.स. २००३) ह्यांचे जन्मस्थान अमरावती, तर वास्तवस्थान नागपूर हे होते. ह्याचाच अर्थ ते विदर्भातील होते. त्यांचे संपूर्ण आयुष्य विदर्भातच गेले होते. त्यांनी माधव जूलियनांच्या 'गझला'पेक्षा सर्वार्थाने वेगळी, सर्वार्थाने तंत्रशुद्ध व सर्वार्थाने अस्सल मराठी गझल विपुल लिहिली. त्यांची ही गझल त्यांच्या पुढील पाच कवितासंग्रहांमधून पहावयास मिळते. १. 'रूपगंधा' (इ.स. १९६१), २. 'रंग माझा वेगळा' (इ.स. १९७४), ३. 'एल्गार' (इ.स. १९८३), ४. 'झंझावात' (इ.स. १९९४) व ५. 'सप्तरंग' (इ.स. २००२). त्यांच्या ह्या संग्रहबद्ध

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवितांची संख्या ४३० इतकी भरते, तर 'गझल' ह्या कविताप्रकारातील कवितांची संख्या २५३ इतकी भरते. प्रेमभावना, सामाजिक आशय व आत्मचिंतन हे भटांच्या गझलेचे प्रमुख आस्थाविशेष होत. परंतु त्यातल्या त्यात भटांच्या गझलेचा अधिक कल हा दिवसेंदिवस सामाजिक आशय व्यक्त करण्याकडे असल्याचे दिसून येते. त्या अर्थाने भटांची गझल ही 'जदीद गझल' (आधुनिक किंवा नवमतवादी गझल) म्हणता येते. भटांच्या गझलेतील अनुभवविश्व, हे विश्व व्यक्त करण्याची तिची तऱ्हा, त्यासाठी आलेल्या म्हणी, वाक्प्रचार, तसेच पौराणिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक संदर्भ, योजलेली प्रतीके, प्रतिमा, शब्द, शब्दप्रयोग अशा अनेक पातळ्यांवर तिचे अस्सल मराठमोळेपण जाणवत राहते. त्यातून भटांचे स्वतःचे, तसेच मराठी समाजाचेही मराठमोळेपण व्यक्त होते. त्या अर्थाने भटांची गझल एकीकडे आत्मनिष्ठ आहे, तर दुसरीकडे समूहनिष्ठ, समाजनिष्ठ अशीही आहे. हे मराठमोळेपण जपताना जोपासताना तिने गझलेचे पारंपरिक तंत्र मात्र डोळ्यांआड होऊ दिले नाही किंवा हे तंत्र सुधारून मराठीत आणण्याचा माधव जूलियनांप्रमाणे प्रयत्नही केला नाही. गझलेमधील द्विपदींच्या गुंफणीवरून 'गझले-मुसलसल्' (एकच विषय हाताळणाऱ्या द्विपदींची एकत्र गुंफण केलेली गझल) व 'गझले-गैरमुसलसल्' (भिन्नभिन्न विषय हाताळणाऱ्या द्विपदींची एकत्र गुंफण केलेली गझल) हे दोन गझलप्रकार असून भटांची बहुतांश गझल ही दुसऱ्या प्रकारात मोडणारी आहे. हा दुसरा प्रकार मराठीत भटांनीच प्रथम आणला व तो कविप्रिय व रसिकप्रियही केला.

ह्या पार्श्वभूमीवर आता आपण सुरेश भटांच्या काही प्रातिनिधिक गझलांमधून व्यक्त झालेली जननिष्ठा तपासून पाहू. भटांचा 'रंग माझा वेगळा' (प्रथमावृत्ती इ.स. १९७४) ह्या दुसऱ्या कवितासंग्रहामध्ये सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या पाच गझला आढळतात. त्यांची शीर्षके अशी आहेत :

'भविष्य' (पृ. ७), 'पालखी' (पृ. ४७), 'उपदेश' (पृ. ५४), 'विजय' (पृ. ५९) व 'मी निघालो' (पृ. ६९).

उच्चवर्णीय-कनिष्ठवर्णीय, श्रीमंत-गरीब, स्पृश्य-अस्पृश्य, विद्वान-अडाणी ह्यांच्यामध्ये जो प्रकट-अप्रकट स्वरूपात समाजात सतत वर्गसंघर्ष चाललेला दिसतो; तो कवीला अस्वस्थ करतो, संतप्त करतो आणि संघर्षात सर्वसामान्यांच्या बाजूने लढ्यात उतरावयालाही प्रवृत्त करतो. सामाजिक विषमतेविरूद्धच्या ह्या लढ्याचे थोडक्यात, परंतु सर्वांगीण चित्रण भटांनी आपल्या ह्या पाच गझलांमधून समर्थपणे केलेले आहे. त्यातून ताठ कॉलरींचा ताठा वाकणार असल्याची आशा (भविष्य, पृ. ७), सामाजिक विषमतेविरूद्धच्या लढ्यात आलेल्या पराभवानंतरची निराशा (पालखी, पृ. ४७), गरिबाला उपदेश करण्याचे निमित्त साधून प्रस्थापितांचा केलेला उपहास (उपदेश, पृ. ५४), क्षणिक पराभवानंतरही अंती आपलाच विजय होणार असल्याची वाटणारी खात्री (विजय, पृ. ५९) स्वतःपुरते पाहणारा समाज असल्यामुळे आपण करीत असलेल्या सामाजिक लढ्यांमध्ये इतरांची साथ मिळणार नाही असे वाटत असतानाच अनपेक्षितपणे ती साथ मिळाल्यावद्दल झालेला आनंद (मी निघालो, पृ. ६९), अशा संमिश्र भावनांचे दर्शन घडते व ते अस्वस्थ आणि अंतर्मुख करून जाते.

ह्या गझलांमधील प्रभावी आशय-अभिव्यक्तीच्या दृष्टीने पुढील द्विपदी महत्त्वाच्या वाटतात

"तलम माणसांनी घ्याव्या कागदी भराऱ्या
उद्या वाळवी साऱ्यांना लागणार आहे !"

"मठोमठी मंबाजींना कीर्तने करू द्या;
विठू काय बेमानांना पावणार आहे ?"
(दोन्ही द्विपदी भविष्य, पृ. ७)

"अरे, कसे अजून हे कुणी न तख्त फोडले ?
लहानशी घरेच ही फुटावयास लागली !"

"अजून विठ्ठलापरी दिसे कुठे न भाकरी;
अजून पालखीपुढे जनावरेच चालली !"
(दोन्ही द्विपरी पालखी, पृ. ४७)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"वोंवा अशा मारू नको ! त्यांना तुझी चिंता किती !
मागेच दुःखाची तुझ्या भरली तयांनी टेंडरे !"
"येतात जे ओठावरी ते शब्द तू वोलू नको;
असती तुझ्या गरजेहुनी गरजू तयांची लेक्चरे !"
(दोन्ही द्विपदी : उपदेश, पृ. ५४)

"आजचे अमुचे पराभव पचवतो आम्ही उद्यास्तव;
विजय तो कसला उरावर जखम जो करणार नाही !"
(विजय, पृ. ५९)

"हा न टाहो दुःखितांचा, हा सुखाचा ओरडा;
होत आहे दूर वंडाचा पुकारा वेगळा !"

"जागलो तेव्हा न होता माझियापाशी दिवा;
मी निघालो अन् उदेला एक तारा वेगळा !"
(दोन्ही द्विपदी मी निघालो, पृ. ६९)

भटांच्या 'एल्गार' (प्रथमावृत्ती : इ.स. १९८३) ह्या तिसऱ्या कवितासंग्रहामध्ये सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या सतरा गझला आढळतात. त्यांची शीर्षके अशी आहेत

'एल्गार' (पृ. १), 'आम्ही' (पृ. २), 'जावसाल' (पृ. ४), 'फुटका पो' (पृ. ७), 'खुलासे' (पृ. २७), 'यार हो !' (पृ. ३१), 'आवाज बंद यंदा' (पृ. ५१), 'पादुका' (पृ. ६०), 'काचपात्रे' (पृ. ६८), 'निष्कर्ष' (पृ. ७०), 'चरे' (पृ. ७०), 'मी नाही !' (पृ. ७७), 'झुंज' (पृ. ७९), 'कुत्रे' (पृ. ८३), 'बोलणी' (पृ. ८४), 'नामांतर' (पृ. ८५) व 'ते हेच !' (पृ. ८६).

ह्या सतरा गझलांमधील अधोरेखित अशा सहा गझलांमध्ये सर्वच्या सर्व द्विपदी मधून सामाजिक आशय व्यक्त झालेला आहे. राहिलेल्या अकरा गझलांमध्ये मात्र सर्वच्या सर्व द्विपदींमधून जरी नसला, तरी निम्याहून अधिक द्विपदींमधून सामाजिक आशय व्यक्त झालेला आहे. शिवाय एखाद्या दुसऱ्या द्विपदीमध्ये सामाजिक आशय व्यक्त झालेला आहे, अशा इतर विषयांवरील २६ गझलांचाही येथे विचार केला पाहिजे. त्याचे पृष्ठांक असे आहेत

५, १५, २१, ३६, ३८, ३९, ४३, ४७, ५०, ५४, ५५, ५९, ६०, ६१, ६२, ६४, ६७, ६९, ७१, ७२, ७३, ७८, ८०, ८९, ९२ व ९६ ह्या सर्व गझलांमधून भटांनी उच्च वर्णीय, उच्चभ्रू वर्ग, उंची नोकऱ्यांवर असणारे विद्वान, सत्ता हा केंद्रबिंदू मानणारे राजकारणी, कृती न करता नुसते बोलणारे क्रांतीकारक, समाजसुधारक, स्वतःचे संतत्व हरवून बसलेले संत ह्या समाजातील जबाबदार म्हटल्या जात असलेल्या लोकांचा ढोंगीपणा कधी सरळ, साध्या थेट पद्धतीने; तर कधी उपरोध-उपहास ह्यांचा अवलंब करून उघडकीस आणलेला आहे. भट एवढ्यावर थांबत नाहीत, तर ते सर्वसामान्यांच्या बाजूने उभे राहतात. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण, शिक्षण, साहित्य इ. क्षेत्रांमधील अपप्रवृत्ती त्यांना अस्वस्थ करतात. ह्या अस्वस्थतेतूनच ते भीडभाड न बाळगता ह्या अपप्रवृत्तींचे मुखवटे टराटरा फाडण्यास आणि आत दडलेले खरेखुरे जळजळीत सत्य सांगून टाकण्यास प्रवृत्त होतात. ह्या सर्व गोष्टी सहजासहजी संपुष्टात येणे कठीण आहे, हे जाणून ते संघर्षाचा मार्ग पसंत करतात. ह्या संदर्भातील विविध पैलू भटांनी आपल्या ह्या गझलांमधून नेमकेपणाने पकडले आहेत. विविध प्रकाराचा अन्याय-अत्याचार करणाऱ्या समाजातील वरचा वर्ग, त्याखाली भरडला जात असलेला सर्वसामान्य माणूस, ह्या सर्वसामान्य माणसाला सुखाने व ताठ मानेने जगावयाचे असेल, तर संघर्षाचा मार्ग स्वीकारला पाहिजे, असे कवीचे झालेले मत, संघर्ष करताना येणारे यश-अपयश, त्यातून येणारा उत्साह-निरुत्साह, सरतेशेवटी आपलाच विजय होणार, ह्याबद्दल कवीला वाटणारी खात्री अशाप्रकारचा एक सूत्रबद्ध जीवनविषयक दृष्टिकोन ह्या गझलांमधून पहावयास मिळतो. ह्या सर्व दृष्टीने महत्त्वाच्या काही द्विपदी अशा आहेत

"हे ही असेच होते, तेही तसेच होते,
आपापल्या ठिकाणी सारे ससेच होते"
(उशीर, पृ. ६०)

"त्यांचाच देश ज्यांच्या ताब्यात भाकरी !
त्यांचेच सत्य ज्यांच्या हातात बंदुका"
(पादुका, पृ. ६०)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

''अरे, येथील कैद्यांच्या पिढ्या आल्या तशा गेल्या
मुके ते जन्मले होते, मुकाट्यानेच ते मेले !''
(झेले, पृ. ६२)

''सूर्य केव्हाच अंधारला यार हो या,
या, नवा सूर्य आणू चला यार हो''
(यार हो, पृ. ३१)

''करू नका एवढ्यात चर्चा पराभवाची
रणात आहेत झुंजणारे अजून काही !''
(अजून काही, पृ. १५)

''कशी ही बोलकी झाली घरे ओसाड गावाची
सुने रस्तेच हे गाती पुन्हा गीते उठावाची''
(चहाडी, पृ. ३९)

''आली नव्या जगाची नवी पहाट आली
आता उन्हात आणू पाळीव काजव्यांना !''
(जानवी, पृ. ७८)

अशाप्रकारे भटांच्या सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या ज्या गझला आहेत, त्यांमधून समाजवादी विचारसरणी मानणाऱ्या भटांचे दर्शन घडते. समाजातील वर्गसंघर्ष त्यांना अस्वस्थ आणि अंतर्मुख करतो. त्यातून त्यांच्या समाजचिंतनाला चालना मिळते. हेच समाजचिंतन मग ते गझलांमधून व्यक्त करू लागतात. त्यांच्या सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या गझलांची निर्मितीप्रक्रिया साधारणपणे ह्या पद्धतीने दिसते. सामाजिक विषमतेच्या लढ्यात ते सर्वसामान्यांच्या बाजूने उभे राहतात आणि सर्वसामान्यांना नाडणाऱ्या, पिडणाऱ्या, फसवणाऱ्या प्रवृत्तींविरूद्ध चीड, संताप व्यक्त करतात. त्यासाठी ते कधी सरळ, कधी स्पष्टपणे; तर कधी वक्रोक्ती, उपहास, उपरोध अशा पद्धतीने आपल्या मनातील सामाजिक आशय व्यक्त करतात. तो व्यक्त होत असताना त्यामध्ये तुकारामांचा फटकळपणाच्या पातळीवरील रोखठोकपणा जसा जाणवतो, तसाच केशवसुतांचा आवेशही जाणवतो. त्याचबरोबर कुसुमाग्रजांचा ध्येयवेडेपणा, नारायण सुर्वेच्या थेट जाऊन भिडणारा धारदारपणाही जाणवतो. त्याचा अर्थ भटांचा सामाजिक आशय व त्यांची अभिव्यक्ती ह्या गोष्टी उसन्या आहेत किंवा त्या इतर कवींच्या प्रभावातून आलेल्या आहेत, असा मात्र नाही. भटांचे भांडण विशिष्ट व्यक्तींशी किंवा विशिष्ट वर्गाशी आहे, असे जरी वरवर दिसत असले; तरी सूक्ष्मपणे विचार केल्यानंतर हे स्पष्ट होते की, त्यांचे भांडण विशिष्ट प्रवृत्तींशी आहे. ह्या संदर्भातील आपली भूमिका त्यांनी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'च्या १९८६ च्या दिवाळी अंकातील मुलाखतीत स्पष्ट केलेली आहे. ह्यावरून ह्या अनुमानास पुष्टीच मिळते.

भटांच्या गझलेतील जीवननिष्ठा ह्यावर आता अधिक भाष्य न करता इतकेच म्हटले, तरी चालेल की, भटांची गझल मोठ्या प्रमाणावर सामाजिक आहे, समाजनिष्ठ आहे, साहजिकच ती जननिष्ठही आहे. तिच्यातून व्यक्त झालेली जननिष्ठा ही आधीच्या सर्व मराठी गझलकारांपेक्षा कितीतरी पटीने संख्यात्मक व गुणात्मक ह्या दोन्ही दृष्टीने अधिक आहे.

समारोप :

अशाप्रकारे आपण प्रस्तुत शोधनिबंधातून मराठी गझलेतील जननिष्ठेचा धांडोळा घेऊन पाहिला. हा धांडोळा आपण मराठी गझलेच्या आजपर्यंतच्या वाटचालीतील प्रमुख तीन टप्प्यांवरील अमृतराय-मोरोपंत, माधव जूलियन व सुरेश भट ह्या मोजक्या व महत्त्वाच्या गझलकारांच्या गझलेच्या संदर्भात पाहिला आहे. मात्र संपूर्ण मराठी गझलेचाच अशाप्रकारे धांडोळा घेऊन पाहण्यास बराच वाव आहे, हे शेवटी नमूद करावेसे वाटते.

संदर्भ व टीपा

१. पहा : प्रा. वडस्कर या. वा., 'जनसाहित्याच्या दिशेने', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती इ. स. १९८८
२. पहा डॉ. सावरकर सुभाष, 'जनसाहित्य', मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, प्रथमावृत्ती इ.स. १९९३.
३. पहा : डॉ. मेंढे नीळकंठ गोपाळ, 'जनसाहित्य : चिंतन आणि चिकित्सा', मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रथमावृत्ती : इ. स. २००३

४. डॉ. मंचरकर र. बा., अध्यक्षीय भाषण, नववे मराठी जनसाहित्य संमेलन, संयोजक मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, स्थळ : गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर, २ व ३ ऑक्टोबर २००५

५. पहा : डॉ. सावरकर सुभाष, 'अक्षरवैदर्भी', अमरावती, दिवाळी अंक १९९६, पृ. १७

६. डॉ. सावरकर सुभाष, उ. नि., पृ. ७७

७. डॉ. तराळ सतीश, 'जनसाहित्याची संकल्पना', 'मराठी जनसाहित्य परिषद राष्ट्रीय चर्चासत्र स्मरणिका', संपादक डॉ. चवरे रा. गो., कला व वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ, प्रथमावृत्ती : १० व ११ फेब्रु. २००७, पृ. ४२

८. अधिक तपशिलासाठी पहा डॉ. सांगोलेकर अविनाश (संपादक), 'मराठी गझलविश्व' गजलसागर प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती : १२ फेब्रु. २००५

९. पहा पटवर्धन माधवराव, 'छंदोरचना', आर्यसंस्कृती मुद्रणालय, पुणे, पहिली आवृत्ती इ.स. १९२९, पृ. २२९ (?)

१०. पहा डॉ. जोशी ना. ग., 'तुलनात्मक छंदोरचना', मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती इ.स. १९६८, पृ. ३६५

११. पहा : प्रा. तेंडुलकर रमेश अ., मराठी गझलेचा ओनामा (लेख), अंतर्भूत 'सत्यकथा', मुंबई, दिवाळी अंक १९७७, व. ४५, अं. १ (नोव्हें. १९७७), पृ. १२२-१२४

१२. पहा : डॉ. कांबळे (सांगोलेकर) अविनाश, मराठी गझलेचा उगम : स्वरूप व मीमांसा (शोधनिबंध), अंतर्भूत : रयत शिक्षण संस्थेचे 'रिसर्च जर्नल', सातारा, व. १, अं. २, जुलै-डिसें. १९९३, पृ. १-९

१३. अधिक माहितीसाठी पहा डॉ. कांबळे (सांगोलेकर) अविनाश, 'मराठी गझल ३ १९२० ते १९८५', नीहारा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती : इ.स. १९९५, पृ. ५७-७०

■ ■ ■

वर्गणीदारांसाठी सूचना

१. 'युगवाणी'चे अंक मिळण्यासाठी वर्गणीदारच व्हावे हे उत्तम.
२. 'युगवाणी' हे त्रैमासिक स्वरूपात निघणार असून एका वर्षातील चार अंकांची वर्गणी १०० रु. आहे.
३. वर्गणी फक्त मनीऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टने ('विदर्भ साहित्य संघ' या नावाचा) स्वीकारण्यात येईल.
४. सध्या, वर्गणी फक्त एका वर्षाची स्वीकारण्यात येईल.
५. वर्षाच्या मधल्या अंकापासून वर्गणीदार झालेल्यांना आधीच्या अंकाच्या प्रती शिल्लक असल्यास पाठवणे शक्य होईल.
६. वर्गणी पाठविताना आपले नाव, संपूर्ण पत्ता, पिन कोड आणि फोन नंबरही कळवावा.
७. मनीऑर्डर फॉर्मवर 'संदेशासाठी असलेल्या रिकाम्या जागेत' वर्गणीदारांनी स्वतःचे नाव व पूर्ण पत्ता लिहिणे अतिशय जरूरी आहे.

पत्ता : १. 'किताब', राऊतवाडी, अकोला - ४४४००५
२. विदर्भ साहित्य संघ, झाशीराणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४००१२.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ पाच कविता ॥

▶ कैलास रा. दौंड

१. गाभाडवीज

पेरले जे माळरानी
बीज गेले गाभाडून
रूजवाई व्हावा दाणा
आणु कुठे सापडून ?

रक्ता आतले जे सत्व
तेही शिंपून पाहिले
काळजातले जे प्राण
तेही ओतून पाहिले.

माती कण्हते अजून
बीज रूजावे म्हणून
माथ्यावर येते उन्हं
बीज जोजावे म्हणून.

कुण्या तंत्रज्ञाने इथे
खोल घातला मोडता
बीजातून हिर्वाईने
पाय घेतला काढता.

कुणास ठावे अजून किती
वाट पाहावी पेरणीला
घरात बी अन् मनात खत
जीवासाठीच जीव आहे झुरणीला.

२. चाय

मातीवर वाळलेली
कुणबटी साय
रदाडाच्या झिजण्याला
लागलेली चाय.

माती पावसाळी ढग
तिच्या आत धग
माती उलारते तेव्हा
कुणबटी लगबग.

माती कुणव्याशी खाते
तिला खाय खाय
तिच्यामधी रवलेला
उभा त्याचा पाय.

मातीमायी विणवितो
नको गाभाडू दे बीज
लेकरांना मिळू देत
राबायाचे बळ नीत.

३. ही धुंदुक धुंदुक हवा

ही धुंदुक धुंदक हवा
अन् धुसर ढवळे आभाळ
उदासून गेली आहे
अवघी सांज सकाळ.

आगोठीला काळ झोप
माही ढासळला पाऊस जाळ
वाऱ्यासाठी धावे वारे
ओस चौफेर रानोमाळ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४. सीता भूमीची पोरगी

अगं कुणव्याच्या पोरी
मोठ्याच्या गं घरामंदी
तुह्या सासूच्या दुधाला
दिल्या हुंड्याच्या झाडाला
शेजी करीते परकार
वासे घराचे फिरता
तुह्या सासूच्या दुधाला
दिल्या हुंड्याच्या झाडाला
लेका आधी लेकींनीच
साजूक तुपाला टाकूनी
कायद्याच्या जंगलात
चिल्यापिल्यांचा आकांत
कुठं खोलावं काळीज ?
माय वापाच्या जिवाला
अजूनही मायवाप
सासरची ओढीते ग
पोटच्या ग गोळ्या बाई,
तिच तिचा वाली वाई
कोण्या देशाचे सर्कार
कोण्या देशातले लोक
रानमळ्याची विहीर
दोन लेकीच्या ग संग
गावामधी होते लोक
लेक मरता देखत
सीता भूमीची पोरगी
साऱ्या साऱ्या जैन्हांमदी

तुही खानदान सोनं
जाऊ नकू हरकून.
नाही साय आली बाई
म्हणू नये आंबेराई.
सासू सुखानं हासते
मैना मरण सोसते.
नाही आईची गं गोडी
म्हणू नये गर्द झाडी.
तुझी उजवली कूस
तिला लेकाचीच हौस.
रोज नवरा झोडीतो
घाम घराला फोडीतो.
कुठं घागर ओतावी ?
कशी पऱ्हानी लावावी ?
किती सोसतात पोरी
गळा लावलेली दोरी.
दुजं कोण सांभाळीतं ?
जिचं झालेली वाळांत.
म्हणे लेकिला पाळीते
जितं सर्णावं जाळीते.
खाली टेकून घमीलं
तिनं जगणं त्यागीलं.
लोक कसले राक्षस
नाही राहिले साक्षीस
रोज भूमीतच जाते
कोण तिचा वाली होते.

५. दुपारही येण्याआधी

दुपारही येण्याआधी
ऊन्हे पिकू लागली
वसंताच्या चाहुलीने
राने झुकू लागली.

गंध पिऊनिया वारे
दऱ्यातून, पानातून
उधाणते आत्मफूल
अशी घुमतसे धून.

उन्हे आली सरकली
गेली चटका लाऊन
भूई थोपावते तरी
पळे सावली भिऊन.

॥ कसे सांगावे॥

नीळकंठ कदम

कसे सांगावे
आयुष्य सकळ
वासनेला येई
नदीचा पूर

काजोळले दिन
झाकोळला काळ
वेदनेला आहे
प्रहरांचा मार

तुटावी आता
जिण्याची नाळ
पाप पुण्यातले
मिटावे अंतर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

।। ययातीचे देहान्तर ।।

। परशुराम

। मराठी अनुवाद प्र. ब. कुळकर्णी

राजा ययातीने आपला धाकटा पुत्र - पुरू, ह्याला बोलावून घेतले आणि तो म्हणाला, ''बाळा, मी गेली पंचेवीस वर्षे तू मला स्वेच्छेने दिलेल्या तारुण्याचा उपभोग घेत आहे आणि तिकडे तू माझ्या वार्धक्याचे जड ओझे वागवत आहेस. आता मला सर्व भौतिक सुखांचा उबग आला आहे. उपभोगांनी आपल्या वासनांची तृप्ती होते यावर माझा जवळ-जवळ विश्वास उरला नाही. वासनारूपी अग्नीला ते अधिकच चेतवत जातात. पेटत्या ज्वालांमध्ये चरबी टाकत गेले की त्या जास्तच भडकतात ! म्हणून मनुष्याने असे एक काम करावे की जेणेकरून आपल्या वैषयिक वासनांचा कायमचा त्याग होईल. तू माझ्या पाच पुत्रांमध्ये सर्वात कनिष्ठ असला तरी निर्विवादपणे सर्वात श्रेष्ठ आहेस. तुझे सगळे भाऊ, जणू आप्पलपोटी जनावरे. त्यांनी माझ्या अजीजीच्या विनवण्यांकडे मुळीच लक्ष दिले नाही. पण तू मात्र आपले नवप्राप्त तारुण्य मी मागता क्षणीच मला देऊन टाकलेस. आणि बदल्यात माझे म्हातारपण, गळतीला लागलेले केस, दंतहीन मुखवटा आणि शक्तिहीन होत चाललेली इंद्रिये मिळविलीस. पुत्रा, तू माझे वार्धक्य मला आता दे आणि तू मला दिलेले तुझे लोपलेले यौवन तर परत घेच पण त्या सोबत माझा राज्याचाही स्वीकार कर. तुझ्या पसंतीच्या एखाद्या सुंदर नवयुवतीशी लग्न कर आणि चिरकालपर्यंत माझ्या सर्व वैभवाचा आणि समृद्ध आयुष्याचा उपभोग घे. मी आता गृहत्याग करून वनवासी होऊ इच्छितो.''

प्रस्तुत कथेला अल्पशा प्रास्ताविकाची पुस्ती जोडायला हवी. राजा ययातीची प्रथम पत्नी देवयानी ही ऋषिश्रेष्ठ शुक्राचार्यांची कन्या होती. तिला दोन पुत्र होते. त्याची दुसरी पत्नी शर्मिष्ठा, ही दैत्यराज वृषपर्वा ह्याची मुलगी. तिला तीन पुत्र होते. त्यातला सर्वात कनिष्ठ पुरू. ययातीने शर्मिष्ठेशी चोरून लग्न केले. ते देवयानीला कळताच ती कोपली आणि आपल्या पितृगृही परतली. ययातीने एकाएकी आपले तारुण्य जे गमावले आणि तो जो गलितागत्र म्हातारा होऊन बसला होता तो शुक्राचार्यांच्या शापामुळे !

आपल्या पित्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतल्यावर पुरू म्हणाला, ''तात ! क्षमस्व ! मी एकदा आपली आज्ञा पाळली. पण आता दुसऱ्यांदा आपली ही आज्ञा पाळण्याची माझी मुळीच इच्छा नाही. म्हणून कृपा करून ही आज्ञा परत घ्या. माझे लुप्त तारुण्य परत भोगण्याची मला तिळमात्र इच्छा नाही. आपणच त्याचा यथेष्ट उपभोग घ्यावा. माझ्या वार्धक्यात मी तृप्त आहे.''

ययाती म्हणाला, ''सोम्य, तू तर मला विस्मयचकित केले आहेस. माझ्या इच्छेप्रमाणे तू माझे वार्धक्य स्वीकारलेस तेव्हाच तुझे वय पंचवीस वर्षांनी वाढले. आता हे माझ्या आकलनापलीकडचे आहे.''

पुरू म्हणाला, ''पिताश्री, आपण वर्तमान परिस्थितीचा विचार करा. माझ्या तारुण्याच्या बदल्यात आपले वार्धक्य तुम्ही मला दिले तेव्हा मी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केवळ वीस वर्षांचा होतो. तुम्ही साठी गाठलेली. आता पंचेवीस वर्षे उलटली. तुम्ही मध्यम वयाचे पंचेचाळीशीचे झालात तर मी पंचाऐंशीचा जराजर्जर वृद्ध झालो. आता तुमचे मध्यम वय घ्यावे असे मला वाटत नाही. मी वार्धक्य पत्करल्या दिवसापासून शास्त्रे-पुराणे यांचे अध्ययन-ध्यानधारणा, ईश्वर-प्रणिधान ह्यात तल्लीन होऊन गेलो आहे. इंद्रियांचा विहार मला नीरस वाटू लागला आहे. धन-समृद्धीचे मला कौतुक उरलेले नाही. अनायासे मी अविवाहित राहिलो. सौंदर्यसंपन्न रमणीही आता मला विचालित करू शकत नाहीत. चमचमीत स्वादिष्ट पदार्थ, मग ते सामीष असोत की निरामीष, मला मोहवीत नाहीत. आता मनाची ही संतोषवृत्ती सोडण्याची मला इच्छा नाही. माझे चित्त आता निःश्रेयसाकडे-मोक्षाकडे लागले आहे. अशावेळी मी माझ्या वयाची आपल्या वयाशी अदलाबदल केली तर गेल्या पंचेवीस वर्षातील माझी सगळी साधना निष्फळ होईल.''

मध्यमवयाचा होऊनही ययाती कुळकुळीत काळ्या केशकलापाने, भरघोस मिशांनी आणि पीळदार बळकट देहयष्टीने तिशीपेक्षा मोठा दिसत नव्हता. आणि त्याचा पंचाऐंशी वर्षांचा वृद्ध पुत्र पुरू मात्र डोके शुभ्र बर्फाप्रमाणे पांढरे पडलेला छातीपर्यंत पोचणाऱ्या पिकलेल्या दाढी-मिशांनी निस्तेज दिसू लागला होता. मध्यमवयीन ययाती आपल्या या ठामपणे उभ्या ठाकलेल्या, वृद्ध पुत्रासमोर, काहीसा सचिंत आणि अल्पसा लज्जित झालेला वाटत होता. तो म्हणाला, ''बाळा ! तुझी इतक्या वर्षांची साधना भंग करावी अशी माझी मुळीच इच्छा नाही. पण मी काय करू ? हे तरुणाई सारखे सदा आसुसलेले वार्धक्य मला इतःपर सोसवेनासे झाले आहे !''

पुरू म्हणाला, ''त्यावर सोपा उपाय आहे. आपले हे मध्यमवय एखाद्या सत्पात्र ब्राह्मणाला किंवा क्षत्रियाला देऊन त्याचे वार्धक्य आपण घ्यावे. आपण प्रधानांना आज्ञा केलीत. तर ते दशदिशांना दवंडी पिटून जाहीर करतील. मग इच्छुक याचकांची वाण राहणार नाही, याची मला खात्री आहे. त्यांच्यामधून तुम्हाला जो सत्पात्र वाटेल त्याच्याशी तुम्ही वयाची अदलाबदल करू शकाल. आता मला परवानगी द्या. मला एक विशेष प्रकारचा यज्ञ करायचा आहे, त्यासाठी पूर्वतयारी करणे आवश्यक आहे.''

पुरू राजप्रासादातून बाहेर पडत नाही तोच ययातीच्या पन्नास स्त्रिया अंतःपुरातून बाहेर आल्या आणि त्यांनी त्याला पूर्णपणे घेरले. त्याची प्रथम पत्नी देवयानी, हिने तर कित्येक वर्षांपूर्वीच राजप्रासादाचा त्याग केलेला होता. ती पित्याच्या आश्रमातून पुन्हा कधी परतलीच नाही. शर्मिष्ठा दुसरी राणी. ती एव्हाना साठ वर्षांची झालेली. ती आपला सारा वेळ भजन-पूजन, जपजाप्यात निमग्न राहून कोणात मिसळायला तयार नसे. ययातीने आपल्या पुत्रापासून तारुण्याचा दुसरा बहर संपादल्यानंतर, दरम्यान आपल्या अंतःपुरात आणखी पन्नास राण्यांची भर घातलेली. ह्या राण्यांची वये आता पंचेवीस ते चाळीसच्या आधेमधे होती. त्यांच्यातली सर्वात ज्येष्ठ राणी त्या सर्वांच्या वतीने म्हणाली, ''पतिदेव, हा सगळा गोंधळ कोणाच्या हितासाठी सुरू आहे ? तुम्ही पुरूला आपले तारुण्य परत करून त्याबदली पुन्हा तुमचे वार्धक्य घ्यायला उद्युक्त झालात हे खरे का ?''

''होय, माझा तसला इरादा आहे खरा'' ययाती म्हणाला, ''मला आपल्या यौवनाचा कंटाळा आला आहे. आणि ध्यानधारणेचा शांत जीवनक्रम सुरू करायला मी अत्यंत उत्सुक झालो आहे. पण पुरू माझ्या या निर्णयाच्या औचित्याबद्दल काहीसा कोपित झाला आहे. तो आता पूर्वीचा आज्ञाधारक पुत्र राहिलेला नाही. त्याला मिळालेले वार्धक्य परत करायला नको आहे. जणू ते त्याला लाभलेले फार मोठे वरदान आहे. त्याचे मन वळविण्यात मी अपयशी ठरलो तर मला माझे तारुण्य एखाद्या वृद्ध ब्राह्मणाला किंवा क्षत्रियाला प्रदान करावे लागेल !!''

करंजाक्षी ही सर्व राण्यांमध्ये लहान होती. ती म्हणाली, ''तुमचा हाच शेवटी उद्देश होता तर तुम्ही आमच्याशी लग्ने तरी कशाला केलीत ? तुम्ही आता कित्येक स्त्रियांचे पती आहात, स्वतःचे तारुण्य उपभोगून झाल्यानंतर वरून तुम्ही आपल्या पुत्राचेही तारुण्य उपभोगले आहे. त्यामुळे तारुण्यातल्या शारीरसुखांबद्दल तुम्ही वैतागलेले असाल हे शक्य

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे. पण आम्ही नाही. आता वृद्धापकाळी एकाएकी, तुम्ही जर आम्हाला वाऱ्यावर सोडणार असाल तर तुमच्या हातून घडणारे ते महत्पाप ठरेल.''

ययाती म्हणाला, ''मी विचारपूर्वक हा निर्णय घेतला आहे. आणि तो आता बदलणार नाही. तुम्हा सर्वजणींना मी माझ्या पत्नीत्वाच्या बंधनातून मुक्त केले आहे. तुम्हाला मी भरपूर धन देणार आहे. तुम्ही सर्वजणी हवे तर दुसरे लग्न करू शकता.''

''काहीतरीच काय निरर्थक प्रलाप करीत आहात, पतिदेव !'' करंजाक्षी किंचाळली. ''आम्ही साऱ्याजणी आया झालेल्या आहोत. आता कोण, मी तुम्हाला विचारते, आमच्यापैकी एकीशी तरी लग्नाला तयार होईल ? नुकत्याच जनलेल्या गायीला दुप्पट किंमत असते. पण पदरी लेकरू असलेल्या स्त्रीला उपवर वधू म्हणून मात्र किंमत शून्य असते.''

''अच्छा ! ठीक आहे, ठीक आहे ! मी तुमच्यासाठी अशी काही व्यवस्था करीन की तुम्ही सुखेनैव राहू शकाल. मग दुसरा नवरा न का मिळेना ?'' वैतागून ययाती उत्तरला. ''आता तुम्ही येथून निघावे हेच बरे ! मला अजून बऱ्याच गोष्टी हातावेगळ्या करायच्या आहेत.''

आपला पुत्र पुरु ह्याने विचार बदलावा म्हणून ययातीने खूप प्रयत्न करून पाहिले. पण व्यर्थ ! शेवटी त्याच्या अमात्यांनी पुढील घोषणा जारी केली-

''सर्व ब्राह्मण व क्षत्रिय परिवारातील सुविद्य आणि सुसंस्कारित पौरजनहो, ध्यानपूर्वक ऐका ! सुविख्यात कुरुवंशातील महाराज ययातींना आपले यौवन आता नकोसे झाले आहे. त्यांना आपले तारुण्य एखाद्या सत्पात्र वृद्ध व्यक्तीला प्रदान करण्याची इच्छा आहे. श्री ययाती महाराज पंचेचाळीस वर्षांचे आहेत. एखाद्या तरुणाप्रमाणे ते प्रसन्न आणि तेजःपुंज आहेत. सर्व इच्छुक वृद्धांनी हस्तिनापूरच्या राज दरबारी येत्या प्रतिपदेच्या दिवशी मध्यान्ही उपस्थित राहावे. स्वतः महाराज उमेदवारातून एकाची निवड करतील. त्यांना जो सर्वात सुयोग्य वृद्ध वाटेल त्याच्याशी ते आपल्या तारुण्याची अदलाबदल करतील. त्यांचा निर्णय अखेरचा राहील. त्यावर कोणाचाही उजर ऐकला जाणार नाही.''

सुमारे एक सहस्त्र ब्राह्मण आणि क्षत्रिय वयाच्या ओझ्याने पुढे झुकलेले, घोषित दिनी हस्तिनापूरच्या राजप्रासादात जमले. त्यांचे वयोमान साठीपासून शंभरीपर्यंत होते. त्यांच्यातील काही धनुष्कोडी सारखे वाकलेले, काठीच्या आधारावर भार टाकून उभे होते. काही ठार आंधळे झालेले आणि दुसऱ्यांच्या हाताला धरून पावले टाकीत होते. काही तर मुळीच चालू शकत नव्हते आणि उचलूनच त्यांना आत आणावे लागले होते. ययातीची घोषणा ऐकून स्वर्गातून अश्विनीकुमार बन्धु आणि नारद मुनी हा आदानप्रदान सोहळा पाहण्यासाठी उत्कंठेने हजर झाले होते. परन्तु त्यांनी वेषांतर केलेले असल्यामुळे कोणीच त्यांना ओळखू शकले नाही.

ययातीने सर्व उपस्थित प्रत्याशींचे स्वागत केले आणि तो आता निवडप्रक्रिया सुरू करणार, इतक्यात जख्ख म्हाताऱ्या स्त्रियांचा एक घोळका जमावाला बाजूला हटवीत सभागृहात शिरला आणि थेट राजा ययातीसमोर येऊन उभा ठाकला. त्यांची नेत्री एक वृद्धा ब्राह्मणी होती. तिच्या डोईवर केसांचा मागमूस नव्हता, मात्र तिने कपाळावर आपला वैवाहिक दर्जा घोषि' करणारा भला मोठा कुंकवाचा टिळा ल्यायला होता. आणि लखलखीत लाल पैठणी परिधान केलेली होती. कंपित आवाजात ती ययातीला म्हणाली, ''राजन्, शास्त्रे सांगतात की यौवन, वित्त, सत्ता अन् चंचलता हे चार अधःपतनाला कारणीभूत होऊ शकणारे अवगुण आहेत. त्यातील एक देखील मनुष्याला अधोगतीला न्यायला पुर्याप्त आहे. दुर्दैवाने तुझ्याकडे एकाच वेळी ते चारही गुण एकवटले आहेत. एकच प्रमादशील तारुण्य मनुष्याचा ऱ्हास होण्यास पुरेसे असताना तू दोन-दोन तारुण्य उपभोगिली आहेत. त्याअर्थी तू चांगली कल्पना करू शकतोस की, तुझ्याशी आपल्या वार्धक्याची अदलाबदल झाल्या-झाल्या कोणीही नवयुवक तात्काल स्वतःसाठी पत्नी म्हणून नवयुवतीच्या शोधात बाहेर पडेल. आणि हे घडल्यावर त्याने टाकून दिलेल्या पूर्व वृद्धपत्नीची काय अवस्था होईल ? तिच्या भावभावना काय असतील याचाही तू विचार करायला नको का ?''

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यथाती लज्जित होऊन म्हणाला, "खरे आहे तुमचे. अमात्य, सत्वर घोषित करा की पत्नी जिवंत असलेल्या वृद्धाशी मी माझ्या तारुण्याची अदलाबदल करणार नाही. अशा सर्व उपस्थित वृद्धांना एक-एक सुवर्णमुद्रा देऊन निरोप द्या."

पत्न्या जिवंत असणारे जे वृद्ध होते त्यांनी आपापली सुवर्णमुद्रा घेतली पण - पुढील मौज, राजाची निवड पाहायला ते जागीच बसून राहिले.

दुसऱ्यांच्या खांद्यावर वाहून आणला गेलेला एक वृद्ध, आपल्याला राजासमोर ठेवा असे वाहकांना सांगून पुढे म्हणाला, "महाराजांचा विजय असो ! राजन्, मी कुविरक, सकळ विद्याअधित, वेदशास्त्र-संपन्न असा शतायुषी आहे. मला पाच बायका होत्या पण आता त्या दिवंगत झाल्या. वयांची देवाणघेवाण करायला माझ्याहून अधिक पात्र प्रत्याशी आपल्याला आढळणार नाही याची मला खात्री आहे तेव्हा कृपा करून अविलंब माझ्याशी ही अदलाबदल आपण करावी."

ययातीने आदरपूर्वक त्याचे स्वागत केले आणि तो म्हणाला, "महाशय मी वयोवृद्ध व्यक्तीशी माझे तारुण्य आदानप्रदान करू इच्छितो हे खरे, पण मला अपंग व्हायची इच्छा नाही. प्रधानजी, ह्यांना पाच सुवर्णमुद्रा दान करून निरोप द्या."

पुढचा उमेदवार एक कुबडाने वाकलेला वृद्ध आपल्या दोघा नातवांच्या हाताला धरून धीमेधीमे एक-एक पाऊल टाकत पुढे आला आणि म्हणाला, "महाराज, मी किंचुलुक कार्तवीर्य अर्जुनाचा मी वंशज आहे. वय ऐंशीवर्षं असून दृष्टीने थोडा अधू झालो आहे. लोक माझे बुद्धिवैभव आणि अथांग ज्ञानसंग्रहाने दिपून जाऊन मला 'प्रज्ञाचक्षू' म्हणतात. मला पुष्कळ नातवंडे असली तरी मी दुःखी आहे कारण जो तो मला टाळतो आणि मी मरावे अशी इच्छा धरतो. त्यांचा माझ्या धनावर डोळा आहे. म्हणून मला जर तुझे रसरशीत यौवन लाभले तर मी पुन्हा लग्न करीन आणि दीर्घकाळ सर्व सुखांचा आनंद घेईन."

ययाती उद्गारला, "हे ज्ञानी किंचुलुका, मला माझे तारुण्य एखाद्या वृद्धाला द्यायचे आहे हे खरे, पण तुझे प्रज्ञाचक्षुत्व माझ्या कामाचे नाही. प्रधानजी, ह्यांना पाच सुवर्णमुद्रा द्या अन् वाटेला लावा."

आपल्या अंगच्या गुणवैशिष्ट्यांचे रसभरित काव्यमय भाषेत वर्णन करणारे कित्येक उमेदवार ययातीला भेटले पण त्या संकल्पित महान आदान-प्रदान योजनेमध्ये कोणीही सुयोग्य वृद्ध त्याला भेटला नाही. तेवढ्यात त्या उपस्थित जनसमुदायात एक सळसळ पैदा झाली. शुभ्र दाढी जटाधारी दोन वृद्ध हातांनी, एका अलौकिक रूपसंपन्न युवतीला धरून राजाकडे घेऊन आले. ती तरुणी अप्सरेसारखी सुंदर आणि चित्त खिळवून टाकणारी होती. विस्मित ययातीने त्यांच्याकडे पाहिले आणि तो म्हणाला "महाशय, काय बरे आपला परिचय ? आणि ही अलोकसामान्य सौंदर्यवती ती कोण ? हिच्या अद्वितीय लावण्याच्या तेजाने माझा समग्र दरबार उजाळून निघाला आहे. कोण बरे ही रमणी ?"

त्या दोघा ऋषिवरापैकी मोठा भाऊ दिसणारा वृद्ध उत्तरला, "राजन्, आम्ही बिल्वाश्रम ऋषिकुलाहून आलो आहोत. हा आश्रम विन्ध्यपर्वतराजींच्या पायथ्याशी आहे. भल्लाटक नामक महान ऋषिवरांचे नाव आपल्या कानी आले असेल. मी त्यांचा ज्येष्ठ पुत्र विभिटक आणि कनिष्ठ भ्रातर हरितक. आमच्या समवेत असलेली ही स्वर्गांगना - आहे राजकन्या मनोहारा ! सुवर्त देशाच्या राजा मित्रसेनाची ही पुत्री.

"मित्रसेनाची राणी दिवंगत झाल्यावर, त्याने आपले राज्य पुत्राच्या स्वाधीन करून ध्यान-धारणेचे जीवन जगण्यासाठी वनात जाण्याचे ठरविले. मग त्याने आपल्या कन्येसाठी सुयोग्य वर शोधण्याचा प्रयत्न केला. पण मनोहारा ही त्याची एकुलती एक कन्या होती, ती लटके रुसून पित्याला म्हणाली, "पिताश्री, माझ्या लग्नाची काही गरज नाही. तुमच्यासोबत मला वनात न्या. एरवी तेथे तुमच्याकडे देखभाल करायला कोण आहे ?" तिचा उत्साह पाहून राजाचे मन द्रवले. "आमचे वडील भल्लाटक, राजाचे गुरुघराणे. म्हणून राजा त्यांच्या आश्रमाशेजारी आपली पर्णकुटी बांधून कन्येसह तेथे राहू लागला. आमचे तीर्थरूप पुष्कळच वयोवृद्ध

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झालेले होते. थोड्याच दिवसात ते दिवंगत झाले. मित्रसेनही पंधरा वर्षांचा आश्रमवास झाल्यावर परलोकात गेले. मृत्युसमयी ते आम्हाला म्हणाले, "हर, हर ! माझ्या कन्येचा विवाह करून देण्यापूर्वीच माझा अंतसमय येऊन ठेपला आहे. बन्धु विभिटक आणि बन्धु हरितक, तुम्ही उभयतांनी तिचा प्रतिपाळ करावा. तिचे पाणिग्रहण त्वरेने करून द्यावे. पण लक्षात ठेवा, एखाद्या जरड वृद्धाशी नको. माझी लेक कोणी निवृत्तमनस्क, उतारवयीन मनुष्य जोडीदार म्हणून पत्करणार नाही !! ह्या अटीमुळे आम्ही मोठ्या विवंचनेत पडलो आहोत. आम्ही उभय बंधू भरपूर वय झालेले असल्यामुळे मनोहारासाठी योग्य वर ठरत नाही. अशा धर्मसंकटात असतानाच तुमची घोषणा आमच्या कानी आली. म्हणून हे राजन्, आम्ही येथे येऊन थडकलो आहोत. मी मनोहारासाठी सर्वदृष्टीनी सुपात्र आहे. तेव्हा कृपा करून आपले यौवन तेवढे मला द्या. एकदा मी तरुण झालो की आमच्या विवाहास कोणताच अडथळा उरणार नाही."

तत्क्षणी क्रुद्ध हरितक उसळी मारून ओरडला - "महाराज, माझे बन्धु जे म्हणतात ते सर्वथैव चूक आहे, अनाठायी आहे. त्यांच्यापेक्षा मी अधिक पठण केलेला विद्वान आहे शिवाय देखणाही आहे. आणखी, माझे वय आणि मनोहाराचे वय - यांच्यातील अंतरही खूपच कमी आहे. ती तीस तर मी साठ वर्षांचा आहे. माझे बन्धुराज पासष्ट वर्षांचे आहेत. अर्थातच तिच्याशी लग्न करायला मी त्यांच्यापेक्षा जास्त लायक आहे. आणि तुम्ही तुमचे तारुण्य मला बहाल केले तर मग प्रश्नच नको."

विभिटक, भावाचे औद्धत्य पाहून गगनभेदी गर्जना करीत किंचाळला, "मूर्खा, चूप बैस. वडील भावाच्या लग्नाआधी धाकट्याला लग्न कसे करता येईल ?"

ययातीने मनोहाराकडे पाहिले आणि तिला विचारले, "तुझे मत काय आहे, राजकुमारी ? तू म्हणशील त्याला मी माझे तारुण्य देईन. या दोघांपैकी तू कोणाला अधिक पसंत करतेस ?"

मनोहारा म्हणाली - "मला दोघेही सारखेच आहेत."

ययाती म्हणाला, "हे रूपवती, तू खरोखरच मला संकटात टाकले आहेस. मला स्वतःला देखील हे वाटते की या दोघांमधून हाच निवडावा असा कोणी नाही. आता मी काय करावे असा प्रश्न मला पडला आहे. तू परत एकदा माझ्याकडे पाहा ना, पाहतेस ?"

ययातीने एकवार आपल्या काळ्या कुळकुळीत केसांवरून हळुवारपणे हात फिरवला, आणि आपल्या ऐटबाज मिशांना पीळ भरला. मग तो म्हणाला - माझ्याकडे आयतेच सळसळते यौवन आहे ! समजा मी ते कोणाला तरी देऊन न टाकता मीच तुझ्याशी लग्न केले तर ? मनोहारा, तुला ते आवडेल का ?"

यावर विभितक आणि हरितक कमालीचे संतापले, आणि ओरडले "आपल्या ह्या मुलुखावेगळ्या वागणुकीचा अर्थ काय महाराज ? तुम्ही सर्वदूर डिंडिम मिटला की आपण आपल्या तारुण्याचा वृद्धत्वाशी विनिमय करणार आहेत. मग आता हा विसंगत सूर काढायला धजलात तरी कसे ?"

सभागृहात जमलेले वृद्धही हुरूप येऊन आपापले हात उंचावून म्हणाले - "महाराज, आपणच जर आपले पवित्र वचन मोडले तर निरंतर नरकवासाच्या आगीत होरपळत राहाल. आम्हा लोकांना आधी आमंत्रित करून नंतर अशाप्रकारे वंचित करणे; हा काय दुराचार !"

जमलेल्या समुदायाने ताल धरून बेभान होऊन एकच धोशा घेतला, "नही चलेगा, नही चलेगा"

आता हे प्रकरण वेगाने हाताबाहेर जात आहे हे पाहून नारदमुनी आणि अश्विनीकुमार तेथे प्रगट झाले. ययातीने यथायोग्य सन्मानपूर्वक त्यांचे स्वागत करण्याचा यत्न केला पण नारदांनी त्याला रोखून म्हटले "आता या क्षणी हा उपचार राहू दे. त्यापेक्षा आधी या गोंधळातून वाट कशी काढायची ते पाहा."

ययाती म्हणाला - "मुनिवर ! माझे मस्तक बधीर झाले आहे. आता मी काय करावे, यासंबंधी तुम्हीच मला मार्गदर्शन करा."

नारद म्हणाले, "बघ, तू आपला शब्द मोडला आणि सत्याच्या पथावरून चळलास. आता त्वरित

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुरूला बोलावणे धाड. तो तुझी भूमिका संशोधित करून योग्य मार्ग काढेल.''

राजाचा आदेश प्राप्त होताच पुरू आला व भरगच्च सभागृहात प्रविष्ट झाला. वडिलधाऱ्यांना उचित आदरपूर्वक प्रणिपात करून तो म्हणाला - ''पिताश्री, या कल्लोळात माझा अंतर्भाव करून आपण काय साधू पाहात आहात ? माझा यज्ञ अजून पूर्ण व्हायचा आहे आणि माझे यज्ञपूर्तीचे अवभृथ स्नानही मी केलेले नाही. आपला आदेश येताच मी सारे अर्धवट सोडून धावत आलो आहे. आता मला सांगा की मी काय करावे ?''

ययाती गुपचूप उभा होता. नारदांनी पुरूला म्हटले, ''युवराज, तुझे पिताजी काहीशा हृदय चाचण्याने पीडित झाले आहेत आणि त्यांना त्यातून बाहेर काढणे तुझ्या स्वाधीन आहे. ह्या सभागृहात उपस्थित वृद्धजनांमधून आपले यौवन त्यांनी कोणाशी बदलावे हे तूच आता ठरविले पाहिजे.'' पुरूने एकदा सभोवार पाहिले आणि विचारले - ''ती रमणी, क्षणभरही जिच्यावर नजर स्थिर होत नाही ती - नेत्रदीपक सुंदरी - जिचे दोन्ही हात दोन वृद्धांनी धरून ठेवले आहेत, ती कोण आहे ?''

नारद म्हणाले - ''ती राजकुमारी मनोहारा, सुवर्त देशाच्या कैलासवासी महाराजाची कन्या, ते दोघे वृद्ध त्यांच्या गुरूचे स्वर्गस्थ पुत्र विभिटक आणि हरितक असून दोघेही मनोहाराच्या पाणिग्रहणासाठी इच्छुक उमेदवार आहेत. दोघेही येथे, तुझ्या पिताश्रींचे तारुण्य आपल्या वार्धक्याच्या बदल्यात संपादन करावे या हेतूने आले आहेत. परंतु तुझे पिताश्री विलक्षण कोंडीत सापडले आहेत, कारण त्यांना हे कळेनासे झाले आहे की आपण ही अदलाबदल कोणाशी करावी.''

पुरू म्हणाला - ''मला तर ह्यात मुळीच समस्या वाटत नाही. हा प्रश्न मी चुटकीसरसा सोडवीन. राजकुमारी, ह्या दोन वृद्धांपैकी कोण तुला अधिक योग्य वाटतो ?''

मनोहारा म्हणाली - ''ह्या दोघांपैकी हाच निवडावा असा कोणीच नाही.''

पुरूने क्षणभर विचार केला, आणि म्हणाला - ''हे कोमलांगी मनोहारा मी ह्या प्रश्नाचा तुझ्याशी एकान्तात खल करू इच्छितो. ये, त्या पलीकडच्या अशोकवृक्षाच्या छायेत ये.''

अशोकाच्या खाली बसून पुरूने उपस्थित जनसमूहाकडे तोंड केले आणि तो म्हणाला - ''माझे परमपूज्य पिताश्री, मुनीश्वर नारद, परमादरणीय स्वर्ग-शल्यविशारद अश्विनी कुमारद्वय, आज दरबारात उपस्थित असलेले सभ्यजनहो, आपण माझ्याकडे अवधान द्या की अचानक माझ्या लक्षात आलेली पिताश्रींच्या आशेची उपेक्षा व अवज्ञा आपल्या हातून घडली ही माझ्याकडून मोठीच चूक झाली. मी या ठिकाणी त्या प्रमादाबद्दल विनम्रभावाने क्षमा मागतो आणि माझी वृद्धावस्था त्यांनी स्वीकारावी अशी त्यांना विनंती करतो. त्यांची ह्या काळपावेतो तीच इच्छा होती त्याप्रमाणे करून बदल्यात आपले तारुण्य त्यांनी मला बहाल करावे. राजकुमारी मनोहाराने माझा पती म्हणून स्वीकार करण्याचे वचन मला दिले आहे.''

''आगे बढो...लगे रहो'' नारदमुनी आणि अश्विनीकुमार एकदम उद्‌गारले.

''महाराज ययातींचा विजय असो. युवराज पुरूचा विजय असो'' उपस्थित जनसंमर्द गर्जू लागला. विभिटक आणि हरितक या दोघांचेही चेहरे उतरले. हिरमुसल्या चेहऱ्याने त्यांनी काढता पाय घेतला.

ययाती, स्वतःशीच हळूहळू पुटपुटला 'धिक्कार असो. धिक्कार असो ! तुला हेच करायचे होते तर त्याचवेळी माझ्या चांगल्या सूचनेला धृष्टपणे नकार द्यायची तुला काय अवदसा सुचली ? प्रजाजनांसमोर हा तमाशा उभा करायची काय गरज होती ?''

देवांचे शल्यविशारद अश्विनीकुमार म्हणाले, ''महाराज ययाती, युवराज पुरू, आम्ही आताच शल्यक्रिया करून एकाचे वार्धक्य दुसऱ्याच्या यौवनाच्या जागी आणि त्याचे त्याचे यौवन वार्धक्याच्या जागी बसविण्याची कामगिरी सुरू करतो. आवश्यक ती शस्त्रक्रियेची सामग्री आम्ही सोबत आणलेली आहे.''

नारद मुनी म्हणाले - ''तुम्हा उभयतांना

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काडीचेही काम करण्याची गरज नाही. कायाकल्पाचे काम आपोआप आणि तात्काळ होणार आहे.''

पुरू खाली झुकला आणि त्याने आपल्या पित्याचा पदस्पर्श केला. ययातीने आपला हात पुत्राच्या मस्तकावर ठेवला व तो म्हणाला - ''तुला माझे यौवन आणि मला तुझे वार्धक्य लाभो.''

आणि एका क्षणात हे देहांतर घडून आले !

■ ■ ■

मूळ लेखकासंबंधी

राजशेखर बोस हे बंगाल मधील एक श्रेष्ठ पंडित, वैज्ञानिक आणि कोशकार होते. त्यांनी परशुराम ह्या टोपण नावाने अनेक विनोदी कथा लिहिल्या. ते विसाव्या शतकातील थोर भारतीय विनोदी लेखक मानले जातात.

'आनंदीबाई इत्यादि गल्प' ह्या त्यांच्या कथासंग्रहाला १९५८ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला आहे.

परशुरामांचा चेष्टेचा विषय एखादी व्यक्ती नसते किंवा जाति-समाज नसतो, मानवी स्वभावातील प्रमादशीलता आणि वैगुण्ये ही त्यांच्या उपहासाचा विषय असतात. त्यांचे कथाविषय त्यामुळे कधीच शिळे, कालबाह्य होत नाहीत.

प्रस्तुत कथा ह्या वैशिष्ट्याचे उदाहरण ठरावी.

राजशेखर बोस उर्फ परशुराम ह्यांनी रामायण व महाभारत ग्रंथ मूळ संस्कृतातून संक्षेप व सरलीकरण करून बंगालीत आणले. त्यामुळे सामान्य वाचकाची मोठी सेवा झाली. त्यांनीच चलनटीका नावाचा बंगाली शब्दकोश तयार केला. तो विद्यार्थी, पंडित व साहित्यिक ह्या सर्वांकडून सारखाच उपयोगिला जातो.

पौराणिक परशुरामाने कुऱ्हाडीच्या शस्त्राचा प्रयोग केला तसा प्रस्तुत परशुरामाने लेखणीचा ऱ्हास निर्मितीसाठी उपयोग केला.

विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ भारतीय विनोदीलेखकांपैकी एक हे त्यांचे वर्णन समर्पक होईल.

साभार पोच

- मोहनमाया : गांधी आणि त्यांचा मित्रपरिवार : रामदास भटकळ, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई - ४००००४. २ ऑक्टोबर २००७. किं. २५० रु.
- हाल्या हाल्या दुधू दे (कादंबरी) : बाबाराव मुसळे, बजाज पब्लिकेशन्स, राठी बिल्डिंग, राठीनगर, अमरावती - ४४४६०३. (दुसरी आवृत्ती) एप्रिल २००८. किं. १५० रु.
- ओळींनी अंबर व्हावे (काव्य) : रमेश मगरे, शब्दालय प्रकाशन, वार्ड ७, श्रीरामपूर - ४१३७०९. ऑक्टोबर २००६. मूल्य ११० रु.
- कॉमनवुमन (काव्य) सुनीता झाडे, आकांक्षा प्रकाशन, १४ एनआयटी लेआऊट, राणा प्रतापनगर, नागपूर. मार्च २००६. किं. ८० रु.
- शून्य काळातील कविता प्रसेनजीत गायकवाड, संकेत प्रकाशन, एनआयटी व्यापार संकुल क्र. ६३, हिलरोड, गांधीनगर, नागपूर - १०. सप्टेंबर २००८. किं : ६० रु.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ
।। कार्यवृत्त ।।
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २००८

१४ जानेवारी - विदर्भ साहित्य संघाचा ८५ वा वर्धापन दिन खासदार सुमित्रा महाजन ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष वामनराव तेलंग होते. या प्रसंगी विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयपुरस्कार प्रदान करण्यात आले. समारंभात रंजना पाठक, श्याम पेठकर आणि विदर्भ साहित्य संघाचे ग्रंथालय संचालक डॉ. ईश्वर नंदपुरे यांचा अनुक्रमे साहित्य अकादमी पुरस्कार, दमाणी पुरस्कार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप प्राप्त झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

२६ जानेवारी - गणतंत्र दिनानिमित्त विदर्भ साहित्य संघात ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. या प्रसंगी विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी, सदस्य व सेवक वर्ग उपस्थित होते.

२९ जानेवारी - ज्येष्ठ साहित्यिक, इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ. य. दि. फडके व ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुरेश डोळके यांना विदर्भ साहित्य संघाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. नागपूरचे नाट्य दिग्दर्शक सुंदर बुटाणी व अमरावतीचे रंगकर्मी किशोर दिघेकर यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

५ फेब्रुवारी - मलकापूर येथे ८, ९ व १० फेब्रुवारीला झालेल्या विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. आशा सावदेकर यांचा विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. सुलभा हेर्लेकर आणि आशाताई बगे यांची भाषणे झाली.

१८ फेब्रुवारी - समाजयोगी, पद्मभूषण बाबा आमटे यांना विदर्भ साहित्य संघाने आदरांजली अर्पण केली. अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर होते. याप्रसंगी प्रा. राम शेवाळकर, डॉ. रूपा कुळकर्णी व डॉ. अनंत अडावदकर यांनी आपल्या संवेदना व्यक्त केल्या.

११ मार्च - विदर्भ साहित्य संघाच्या वतीने कादंबरीकार प्रा. सदानंद देशमुख व कवी प्रा. केशव सखाराम देशमुख यांच्याशी अनौपचारिक गप्पांचा व कविता वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

१४ मार्च - कविवर्य सुरेश भट यांच्या ५ व्या स्मृतिदिनी विदर्भ साहित्य संघ व 'सार्थक संवाद' माध्यमसेवेचा 'अनुबंध' यांच्या संयुक्त विद्यमाने 'बिल्वदल काव्यसंध्ये'चे आयोजन करण्यात आले.

२० मार्च - विदर्भ साहित्य संघातर्फे कविवर्य बा. सी. मर्ढेकर यांच्या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र आणि त्यांची कविता' या विषयावर डॉ. विजयराज इंगळे यांचे भाषण झाले.

३० मार्च - ज्येष्ठ कथाकार व विचारवंत बाबूराव बागूल यांना विदर्भ साहित्य संघातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ह्या सभेत वामन तेलंग, डॉ. अरुणा देशमुख व डॉ. रवींद्र शोभणे यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या.

संमेलन विशेष

६ जानेवारी - विदर्भ साहित्य संघ, शाखा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मेहकर, मेहकर मातोश्री एज्युकेशन सोसायटी, आणि मेहकर शहर पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा जिल्हा साहित्य संघाचे ८ वे जिल्हा साहित्य संमेलन दि. ६ जानेवारी २००८ रोजी मेहेकर येथे संपन्न झाले. कवी दासू वैद्य यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. विविध कार्यक्रमाचा आस्वाद साहित्य रसिकांनी घेतला.

१२ जानेवारी विदर्भ साहित्य संघ, शाखा अकोला तर्फे आयोजित जिल्हा साहित्य संमेलन भांबेरी, ता. तेल्हारा येथे झाले. संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीकांत तिडके होते. दिवंगत साहित्यिक बाजीराव पाटील, नानासाहेब वैराळे, किशोर मोरे व कवी उ. रा. गिरी यांच्या स्मृतीला संमेलनातील कार्यक्रम समर्पित केले होते.

८, ९ व १० फेब्रुवारी कै. वि. भि. कोलते यांच्या स्मृतीस समर्पित केलेले विदर्भ साहित्य संघाचे ५७ वे विदर्भ साहित्य संमेलन डॉ. आशा सावदेकर यांच्या अध्यक्षतेखाली बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथे झाले. ह्या संमेलनात कै. बाबा आमटे ह्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. संमेलनाच्या समारोपात भावगंधर्व पं. हृदयनाथ मंगेशकर ह्यांचा भावसरगम हा कार्यक्रम तुडुंब गर्दीत संपन्न झाला.

शाखावृत्त -

भंडारा

३० जानेवारी - शाखेतर्फे गडकरी स्मृतिदिना निमित्य श्री. नीलकंठ रणदिवे यांनी संपादित 'संक्षिप्त एकच प्याला' नाटकाचे साभिनय वाचन केले.

२८ फेब्रुवारी विदर्भ साहित्य संघ, शाखा भंडारा, सार्वजनिक वाचनालय भंडारा व भारतीय विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने कवी कुसुमाग्रज स्मृतिदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी आसामचे माजी मंत्री श्री. द्वारकाप्रसाद तेलंगा यांचे 'अस्वस्थ आसाम' या विषयावर भाषण झाले.

२५ मार्च विदर्भ साहित्य संघ, शाखा भंडारा व सार्वजनिक वाचनालय, भंडारा ह्यांच्या संयुक्त विद्यमाने 'केंद्रीय अर्थ संकल्प - २००८' ह्या विषयावर चार्टर्ड अकाउंटंट श्री. सरंजामे यांचे भाषण झाले.

वरूड

२ जानेवारी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त एल. ए. डी. महाविद्यालय, नागपूरच्या डॉ. सुनंदा देशपांडे यांचे भाषण झाले.

४ जानेवारी 'फुले स्त्री मुक्ती संकल्पना, आज, काल व उद्या' या विषयावर प्रा. कृष्णा चौधरी यांचे भाषण झाले.

२९ मार्च 'समर्थांचे राजकारण' या विषयावर डॉ. कुमार शास्त्री यांचे भाषण झाले. ना. के. वेहरे व्याख्यामालेतंर्गत 'संतश्रेष्ठ तुकाराम' या विषयावर व्याख्यान झाले.

लाखनी

२६, २७ जानेवारी - 'राष्ट्रभक्तिपर गीतगायन स्पर्धा', 'शालिनी दामोदर कथाकथन स्पर्धा' घेण्यात आली.

८ फेब्रुवारी 'मातोश्री भक्तिगीत गायन स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती.

२२, २३ व २४ फेब्रुवारी 'इंदिरा बोरकर व्याख्यानमाला' ह्या तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

अकोला

फेब्रुवारी - शाखेतर्फे 'मराठी राजभाषा दिवस' आणि कविवर्य कुसुमाग्रज जयंती सादर करण्यात आली. कुसुमाग्रजांच्या निवडक कवितांचे वाचन व 'ययाती-देवयानी' नाटकातील स्वगताचे वाचन करण्यात आले.

रामटेक

२४ फेब्रुवारी प्रा. गिरीश नारायण सपाटे यांच्या 'मर्मबंध' या कवितासंग्रहाचा प्रकाशन समारंभ डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या हस्ते डॉ. रवीन्द्र शोभणे ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर ह्यांच्या उपस्थितीत रामटेक शाखेचे नूतनीकरण झाले.

चंद्रपूर

फेब्रुवारी डॉ. मीना प्रभू यांच्या 'मेक्सिको पर्व', 'इजिप्तायन', 'दक्षिणरंग', 'माझे लंडन' या त्यांच्या ग्रंथावर चर्चेचा कार्यक्रम झाला.

■ ■ ■

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ